सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १३४ पाने : ८+४ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




**सोयगाव – संजय जोहरे सोयगाकर,कलाशिक्षक,सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, केंदूर,ता.शिरूर,जि.पुणे यांनी ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला रेखाटलेले सुंदर फलक लेखन**

# लिहाखेडी येथील सरपंच अनितातार्ई साखळे यांचें सरपंच पद कायम

## विभागीय आयुक्तांच्या आदेशाला ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून स्थगितचे आदेश

सिल्लोड /प्रतिनिधी

तालुक्यातील लिहाखेडी येथील सरपंच सौ .अनितातार्ई नामदेवराव साखळे यांनी गावातील मयत व्यक्तीच्या कुटुंबांना वारसा प्रमाणपत्र दिले होते.या प्रकरणी गावातील प्रकाश कौतिक साखळे यांनी विभागीय आयुक्तांकडे अपील केले होते.या प्रकरणी सुनावणी होऊन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी अनितातार्ई साखळे यांना सरपंच पदावरून अपात्र ठरविले होते.

या आदेशा विरूद्ध अनितातार्ई नामदेवराव साखळे यांनी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या यांच्या न्यायालयात दि.२४/०७/२०२५ रोजी अपील केले होते,

> **विभागीय आयुक्त यांनी सौ.अनितातार्ई नामदेवराव साखळे अपात्र ठरविले असल्याचे मला आदेश प्राप्त झाले होते. मा . ग्रामविकासमंत्री यांनी ३१ ऑगष्ट२०२५ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेतली होती.परंतु पुढील निकालाचे आदेश नसल्याने विभागीय आयुक्त यांच्या निकालाचे आदेशाचे पालन करावे लागले.**
>
> **रत्नाकर पगार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड**

या अपिलावर जयकुमार गोरे यांनी दि.३१/०७/२०२५ यांनी रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेतली होती .सुनावणी दरम्यान उपस्थित अपिलार्थी व प्रतिवादी यांचे वकील व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांनी युक्तिवाद केला ,त्यांचें सर्वांचे म्हणणे ऐकून घेत विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिलेल्या या आदेशास स्थगिती देत सौ. अनितातार्ई नामदेवराव साखळे यांचे सरपंच पद कायम ठेवले.



> **२७ फेब्रुवारी२०२१ रोजी विषय क्रमांक ९ नुसार तक्रारदार प्रकाश कौतिक साखळे यांनी सूचविले होते की, लाभार्थ्यांचे स्वयंघोषणा पत्र घेऊन सरपंच सहीनिशी वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे व दि.२०फेब्रवारी २०२१ रोजीच्या मासिक बैठकीत सूध्दा सदस्यांनी वारसा प्रमाणपत्र देण्या बाबत सुचविले होते.त्यानुसार मी वारसा प्रमाणपत्र दिले होते, परंतु ज्यांनी ग्रामसभेत वारसा प्रमाणपत्र देण्याचे सुचवले त्यांनीच पुन्हा राजकीय द्वेष्यातुन तक्रार केली .**
>
> **– सौ.अनितातार्ई नामदेवराव साखळे, सरपंच लिहाखेडी**

**सरपंचांना वारस प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहे की, नाही?**

सरपंच यांना वारसा प्रमाणपत्र देण्याचे अधिकार कायद्यानुसार नाही तर मग ? ग्रामपंचायत अस्तित्वात आल्या पासून गावपातळीवर सरपंच यांनी दिलेली वारसा प्रमाणपत्र, महसूल, बँक सह सर्वच शासकीय, निमशासकीय कार्यालयात का स्विकारले जाते . संबंधित विभागाकडून लाभधारकांना सरपंचांकडुन वारस प्रमाणपत्र आणण्याचा आग्रह का धरला जातो. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई का ? होत नाही अशा प्रश्न उपस्थित होत आहे. गावातील मयत व्यक्तीचे वारस कोण आहे हे सरपंचाना माहिती असते.त्यामुळे मयत कुटुंबातील सदस्यांना दुःख सावरण्या ऐवजी वारस प्रमाणपत्र मिळविण्यासाठी शासन दरबारी उबंरठे झिजविण्याचे काम येऊ नये म्हणून अनेक गावांत सरपंच वारसा प्रमाणपत्र देत असते. परंतु राजकीय द्वेषातून कोणी अशा प्रकारे तक्रार केली तर सरपंचांना पदावरून पायउतार होण्याची वेळ येते, या प्रकरणातून सिद्ध झाले आहे.या प्रकारामुळे या पुढे मात्र कोणताही सरपंच वारसा प्रमाणपत्र देण्याची हिंमत करणार नाही हे मात्र नक्की!

**१३ रोजी च्या हर घर तिरंगा निमित्ताच्या ध्वजारोहणापासून गटविकास अधिकाऱ्यांनी सरपंचांना रोखले .**

लिहाखेडी येथील सौ.अनितातार्ई नामदेवराव साखळे यांनी विभागीय आयुक्त यांच्या आदेशा विरूद्ध ग्रामविकास मंत्री यांच्या न्यायालयात अपील केले असताना गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी ग्रामसेवका मार्फत तोंडी आदेश देऊन दि १३ ऑगष्ठ रोजी झालेल्या ध्वजारोहण करण्यापासून रोखले. त्यामुळे ग्रामविकास मंत्री यांच्या न्यायालयास गटविकास अधिकाऱ्यांकडून केराची टोपली समजली.

## दुधारे स्पोर्ट फाउंडेशनचा नॅशनल बेस्ट टिचरचा सुभाष गवई यांना बेस्ट अवार्ड



बिडकीन दि १४ ऑगस्ट पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालयातील क्रीडा विभाग प्रमुख सुभाष गवई, सरस्वती विद्यालयाचे क्रीडाशिक्षक डॅा.अनिल कांबळे, व भिमाशंकर क. म. गेवराई च्या प्रा. डॅा. उज्वला काबंळे यानां जाहिर.दधारेस्पोर्ट फाऊडेशन नाशिक यांचा नॅशनल बेस्ट टिचर अवार्ड २०२५ चा मान श्री मोहटादेवी विद्यालयाती क्रीडा शिक्षक सुभाष गवई, सरस्वती विद्यालयाचे क्रीडाशिक्षक डॅा अनिल कांबळे, व भिमाशंकर महाविद्यालय गेवराईच्या प्रा. ऊज्वला काबंळे यानां जाहिर झाला आहे.१७ऑगष्ट रोजी नाशिक येथे मोठ्या थाटामाटात त्याचे वितरण होणार आहे. त्यासाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, नातलग मित्र गण यानी शुभेच्छा दिल्या आहेत.

सदर अवार्ड मिळन्यासाठी प्रत्यक्ष, अप्रत्क्ष मार्गदर्शन संस्थापकीय अध्यक्ष डॅा. धनंजय मुखेकर, सचिव वंदना मुखेकर, प्राचार्य मनोज पाटील, भाऊसाहेब दहिहंडे, कोरडे ज्ञानेश्वर, मुख्याध्यापक गौतम ढेकने अनिल काबंळे, दिलीप नरवडे, दिपक कर्डीले, याचे़कडुन लाभले.

## बिडकीन येथिल ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये श्री कृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा

बिडकीन दि १४ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये आज श्री कृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. शाळेच्या संचालिका सविता सतिश तोतला यांच्या हस्ते श्री कृष्ण यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेच्या संचालिका सविता सतिश तोतला यांनी लहान मुलांना श्री कृष्ण जन्माष्टमी सणाच्या शुभेच्छा देवुन माहिती दिली. श्री कृष्ण व राधा यांची वेशभुषा परिधान करुन विद्यार्थी शाळेमध्ये आले होते. तसेच मुलांनी भाषणे, नृत्य, नाटक सादर करुन उपस्थितांचे मने जिंकली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका ज्योती राठोड यांनी केले. यावेळी शाळेतिल शिक्षक विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. मनिषा जाधव, प्रतिक्षा पोटे, ज्योती राठोड, कविता मढिकर, रेखा चव्हाण, नंदीनी चव्हाण यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## एमजीएममध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. १४ : भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त एमजीएम विद्यापीठातील कॉलेज ऑफ कम्युनिकेशन कल्चर अँड मिडिया येथे राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख व्याख्याते जेष्ठ पत्रकार डॉ. जयदेव डोळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर, प्राचार्या डॉ.रेखा शेळके, डॉ.आशा देशपांडे, डॉ. विशाखा गारखेडकर प्रा.कविता सोनी, ग्रंथपाल डॉ.बालाजी दामावले, प्रा. हेमंत रावते, प्रा. सचिन घायाळ, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते. विद्यार्थी जीवनात वाचन हा महत्त्वाचा घटक आहे. तसेच निरंतर वाचनाची सवय यश संपादन करण्यात हातभार लावते, असे मत डॉ. डोळे यांनी यावेळी व्यक्त केले. वाचनसंस्कृती टिकावी या हेतूने दुपारच्या सत्रात 'ग्रंथालय चले हम' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## भव्यदिव्य सेटवर चित्रीत होणार रहस्यमय 'घबाडकुंड'

छत्रपती संभाजीनगर – जीवनात शिखरावर पोहोचण्यासाठी कितीही मेहनत घेतली, कष्ट उपसले, खस्ता खाल्ल्या तरी आयुष्यात एकदा तरी एखादं घबाड मिळावं आणि चुटकीसरशी श्रीमंत होता यावं असे प्रत्येकालाच वाटत असतं. अशाच प्रकारच्या घबाडाची आणि त्याचा शोध घेणाऱ्यांची गोष्ट 'घबाडकुंड' या आगामी मराठी चित्रपटात पहायला मिळणार आहे. 'घबाड' म्हणजे अचानक धनप्राप्ती होणे, एखादी लॉटरी लागणे, नशीबच पालटणे असा घबाडचा अर्थ आहे. 'कुंड' म्हणजे विहीर किंवा पाणी जमा होणारी एखादी खोलगट जागा. या दोन्हींचे मिळून 'घबाडकुंड' असे सिनेमाचे लक्षवेधी शीर्षक ठेवले आहे. विशेष म्हणजे या चित्रपटासाठी भव्यदिव्य, अत्यंत खर्चिक, नेत्रदीपक सेट तयार करण्यात आला आहे. मोठ्या पडद्यावर हा सेट प्रेक्षकांची नजर खिळवून ठेवणारा ठरणार आहे. 'अल्याड पल्याड' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर दिग्दर्शक प्रीतम एस. के. पाटील, निर्माते रसिक कदम आणि सह निर्मात्या स्मिता पायगुडे –अंजुटे यांच्या साथीने सस्पेन्स थ्रिलर जॉनर प्रेक्षकांसाठी घेऊन आले आहेत. ॲक्शन, विनोद, रहस्य असा सगळा भरगच्च मसाला असलेला 'घबाडकुंड' चित्रपट सादरीकरणाच्या दृष्टीने प्रेक्षकांसाठी ट्रीट असणार आहे. 'घबाडकुंड' या चित्रपटाची कथा रहस्यमय असून, यात बऱ्याच चमत्कारीक गोष्टी घडताना दिसणार आहेत. दिग्दर्शक प्रीतम पाटील 'घबाडकुंड'च्या रूपात आणखी एक उत्कंठावर्धक कथानक असलेला बिगबजेट चित्रपट प्रेक्षकांसमोर घेऊन येणार आहेत. या चित्रपटासाठी पुण्याजवळील खेड–शिवापूर येथे सिनेमाचा सेट उभारला आहे.

## 'आझादी एक्सप्रेस', सनी देओलच्या दमदार 'जाट'सोबत

या स्वातंत्र्य दिनी झी सिनेमा घेऊन येत आहे सत्य, धैर्य आणि 'जज्बा'ने भरलेल्या कथा – सकाळी १० वाजता सुरू होणाऱ्या सलग तीन प्रीमिअर्ससह. या लाईन–अपचे नेतृत्व करणार आहे दुपारी १२:३० वाजता होणारा 'जाट'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर, ज्यात 'गदर २'च्या प्रचंड यशानंतर सनी देओल पुन्हा एकदा आपल्या ताकदीच्या भूमिकेत झळकणार आहे. 'जाट'मध्ये सनी एक शूर सैनिकाची भूमिका साकारतो, जो अत्याचाऱ्यांच्या विरोधात उभा राहून लोकांचे रक्षण करतो आणि सन्मान टिकवून ठेवतो. यासोबतच सकाळी १०:०० वाजता 'द साबरमती रिपोर्ट' हा तपासप्रधान ड्रामा आणि दुपारी ३:३० वाजता 'द केरळ स्टोरी' हा थरारक चित्रपट यांसह हा स्वातंत्र्य दिन भारताच्या आणि त्याच्या अदम्य आत्म्याच्या सशक्त कथांनी भरून टाकला जाईल.

## 'उगाओ' कडून ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून 'जॅकी श्रॉफ'चे स्वागत

पुणे : भारतातील नंबर १ गार्डनिंग कंपनी 'उगाओ'ने एक धाडसी आणि अर्थपूर्ण पाऊल उचलत, लोकप्रिय अभिनेता आणि पॉप–कल्चर आयकॉन जॅकी श्रॉफ यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड जाहीर केली आहे. सुप्रसिद्ध अभिनेता भागीदारी, उगाओसाठी एका नव्या पर्वाची सुरुवात ठरणार आहे – जिथे शहरी भारतात आवडणारा हिरवा ब्रँड, आता देशाच्या टियर–२ आणि टियर–३ शहरांमध्येही सांस्कृतिक ओळख निर्माण करणार आहे. गेल्या दशकभरात हरित भारत घडवण्यासाठी उगाओने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दैनंदिन जीवनात निसर्गाशी जोडून राहणे अधिक सोपे, आनंददायी आणि सर्वांसाठी सुलभ करण्यासाठी, कथाकथन, समुदाय–आधारित मोहिमा आणि समजण्यास सोपा, आपुलकीचा वनस्पती–देखभाल विषयक मजकूर अशा धोरणाद्वारे उगाओने ग्राहकांशी भावनिक नाळ जोडली आहे. त्यांच्या डिजिटल उपस्थितीमुळे, घरातील वनस्पती केवळ सजावटीसाठी नसून, त्या जीवनातील सोबती, वैयक्तिक वाढीचे प्रतीक आणि भावनिक अभिव्यक्तीचे माध्यम आहेत, असा दृष्टिकोन रुजवला गेला आहे.

## जरंडीला निघाली तिरंगा रॅली; १०० विद्यार्थ्यांचा सहभाग

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१४ ऑगस्ट

तालुका भाजपाच्या वतीने जरंडी गावात दोन

अनोखे उपक्रम राबविण्यात आले.दि.१३ ऑगस्ट रोजी शहीद विष्णु चव्हाण चौकापासून ते हुतात्मा स्मारकापर्यंत भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.या यात्रेत विविध शाळांमधील १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.तर हुतात्मा स्मारकात १०० रोपांची ग्रामपंचायत कडून लागवड एकाच दिवशी करण्यात आली.

वृक्षदिंडीतून पर्यावरण संवर्धनाचा जागर

तिरंगा यात्रेच्या माध्यमातून वृक्षदिंडी काढण्यात आली.




विद्यार्थ्यांच्या हातातील फलक व घोषणाबाजीमुळे पर्यावरण संवर्धनाची जनजागृती करण्यात आली.

यावेळी या दिंडी यात्रेत माजी नगराध्यक्ष कैलास काळे,माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,सरपंच स्वातीताई पाटील,महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष नंदाताई आगे,वंदनाताई पाटील,पूनम भामरे,तालुकाध्यक्ष संजय पाटील,जिल्हा चिटणीस सुनील गवांडे,जिल्हा चिटणीस संजीवन सोनवणे,शहराध्यक्ष मंगेश सोहनी,मयूर मनगटे,राहुल राठोड,प्रदीप राठोड,दिलीप पाटील,राजेंद्र पाटील,मधुकर पाटील,सुरज कवाल,समाधान बावसकर,गजानन पवार,अण्णा तांगडे,भिवा चव्हाण,अमृत राठोड,आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते हुतात्मा स्मारकात रॅली पोहचल्या वर राष्ट्र गीताने समारोप करण्यात आला.भाजप चे जिल्हा चिटणीस संजीवन सोनवणे, राहुल राठोड,सुनील गव्हांडे, मंडळ अध्यक्ष संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही वृक्षारोपण व तिरंगा मोहीम राबविण्यात आली.

## गंगापुर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी अर्चना कृष्णा सुकासे



तभा वृत्तसेवा

गंगापुर दि.१४ :गंगापुर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अर्चना कृष्णा सुकासे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सभापतीपदी अर्चनाताई सुकासे यांच्या नावावर सर्व सदस्यांनी शिक्कामोर्तब केले आणि कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

गंगापुर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली अर्चना कृष्णा सुकाशे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.सोमवार दि.११ ऑगस्ट झालेल्या निवडणुकीत अर्चना कृष्णा सुकासे यांचा एकमेव अर्ज आला होता.या निवडीनंतर बाजार समिती परिसरात सुकासे यांच्या समर्थकांनी फटाके फोडून जल्लोष केला.तालुका निबंधक नितीन मस्के,गजुलवाड यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणन काम केले.त्यांना मदत सचिव मनीष गजभिये, विजय हिवाळे यांनी केली, मावळते सभापती भाऊसाहेब पदार यांनी ४ जुलै रोजी राजीनामा दिला होता. त्यामुळे ही निवडणूक घेण्यात आली होती.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख दिलीप निरपळ,मा. सभापती नंदकुमार गांधीले,दिलीप राजपूत, रामेश्वर मुंदडा,मा. सभापती भाऊसाहेब पदार लक्ष्मणसिंग राजपूत ,उप सभापती सचिन काकडे. संचालक डॉ. ज्ञानेश्वर निळ.रामेश्वर गवळी,भारत पाटील.ताराचंद दुबिले.दीपक बडे.सतीश डेडवाल,नवनाथ सुराशे.आप्पासाहेब हिवाळे. जाफर शेख,नारायण बाराहाते,उमेश बाराहते. सुशिलाबाई राजगिरे,दीपक जाधव,तोफिक पठाण,रज्जाक पठाण,अनिल राजगि.मारुती खैरे, राकेश कळसकर,संदीप बोजवारे, सारंगधर जाधव,रतन बत्तीशे, ताराचंद पवार, रामेश्वर मालुसरे,कृष्णकांत व्यवहारे, ज्ञानेश्वर सवाई आप्पासाहेब पाचपुते.सुमित मुंदडा.योगेश चव्हाण,आप्पासाहेब पाचपुते, राजेंद्र दारुटे अण्णासाहेब जाधव.रफिक पठाण.मोहसीन फिटर.सिद्धू खाजेकर, योगेश राजपूत.चेतक राजपूत राहुल सटाले यांची उपस्थिती होती.

## पैठण शहरात भाजपाच्या वतीने तिरंगा यात्रा संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ :- पैठण शहरातील नागरिक व भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित तिरंगा यात्रेत हातात तिरंगा, मनात देशभक्ती आणि ओठांवर भारतमातेचा जयघोष घेऊन हजारो शालेय विद्यार्थी व शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला..



ही तिरंगा यात्रा हुतात्मा स्मारक पासून सुरू होऊन छत्रपती शिवरायांच्या पुतळा परिसरात समारोप झाला. आपल्या स्वातंत्र्य सेनानींच्या बलिदानाची आठवण करून देणारी आणि देशाच्या रक्षणासाठी लढणाऱ्या जवानांचा सन्मान करण्यात आला रॅलीत मुस्लिम मौलवी व मुस्लिम बांधवांनी सहभाग घेऊन एकतेचा संदेश दिला.

भारताचा तिरंगा हा आपली ओळख, आपला अभिमान आणि आपली शान आहे. त्याच्या सन्मानासाठी सदैव तत्पर राहण्याचा संकल्प या यात्रेतून प्रत्येक भारतीयाच्या मनात दृढ झाला. तिरंगा रॅली मध्ये संत एकनाथ आयुर्वेदिक कॉलेज, श्रीनाथ हायस्कूल, आर्य चाणक्य विद्या मंदिर, श्री बालाजी विद्यालय, जैन इंग्लिश स्कूल, व्यापारी महासंघ व भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष सुरजजी लोळगे, लक्ष्मणराव औटे, राज्य परिषद सदस्य रेखाताई कुलकर्णी, जिल्हा सरचिटणीस अश्विनी लखमले, बंडू अंधाळे , जिल्हा चिटणीस विजय चाटूपळे, शालीवाहन पतसंस्थेचे चेअरमन किशोर चौव्हाण, व्यापारी महासंघ अध्यक्ष स्वदेश पांडे, सचिव उमेश तट्टू,काझी करिमोतुल्ला कृष्णाशेठ लोळगे, प्रसाद लोळगे, विविध शाळेचे शिक्षक, भाजपा सरचिटणीस सुरेश गायकवाड, सतिष आहेर, डॉ. शांतीलाल राका, सुरेश मानधने , अशोक धस सर, रॅलीचे संयोजक ज्ञानेश्वर दहिवाळ, समिर शुक्ल, योगेश धर्माधिकारी, कैलास बरकसे, सुनील रासने, विशाल पोहेकर, ऋषिकेश बटुळे, सोशल मीडिया निखिल गुप्ता, सुरज घुले, गणेश डूकरे, सार्थक गांडूळे पाटील, विशाल पहिलवान, जगदीश विर, सुनील विर, लक्ष्मीकांत पसारे, सखाराम वाघमारे, लहु गायकवाड, देविदास शेळके, रशिद कुरेशी, विष्णू सोनार, आकाश कुलथे, भगवान गालफाडे, वैभव पोहेकर, तेजस गलधर, शिवाजी तुपे यांच्या सह शिक्षक व नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला.

## पैठण नप तर्फे शाळेतून प्लास्टिक कचरा संकलन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ :- घरात साठवा – शाळेत पाठवा नगर परिषद पैठणचा आगळा वेगळा उपक्रम. कार्यालय नगर परिषद पैठणच्या वतीने पैठण शहराला प्लास्टिक मुक्त करण्यासाठी शहरातील सर्वच शाळांमध्ये जावून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सिंगल युज्ड प्लास्टिक आपापल्या घरी साठवून शाळेत घेवून यायचे. हे सर्व प्लास्टिक नगर परिषदेच्या वतीने प्रत्येक शाळेतून जमा करून घेण्यात आले असून त्याचा योग्य पद्धतीने पुनर्वापर करण्यात येईल. जमा करण्यात आलेले सिंगल युज्ड प्लास्टिक पासून मानवास, पर्यावरणास, प्राणीमात्रास



व जलजीवास होणाऱ्या दुष्परिणामांची कारणे याबाबत शहरातील अनेक शाळेच्या वतीने निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पात्र स्पर्धकांना व शाळेला प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना हि वह्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. याकामी नगर परिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ.पल्लवी अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन वाळुंज श्रीमती. नीता ठोके, धर्मराज उजगरे रेश्मा साबळे ,अमोल शेजूळ, जब्बी धांडे, किरण मगरे, खालील धांडे कर्मचारी काम करत आहेत . तरी १५ ऑगस्ट पासून सुरू केलेला सदर उपक्रम यापुढे हि असाच नियमितपणे सुरू राहणार असून पैठण शहर प्लास्टिक मुक्त करण्याच्या दृष्टीने कार्यरत स्तुत्य उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगर परिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ.पल्लवी अंभोरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बुलडाणा अर्बन संस्थेच्या सिल्लोड विभागाच्या वतीने भाविकांसाठी फराळाची सोय

तभा.वृत्तसेवा


सोयगाव,दि.१४ ऑगस्ट

सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन सर्वसामान्य घटकांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानासाठी कार्य करणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या सिल्लोड विभागाच्या विद्यमाने श्रावणी सोमवार व अंगारिका चतुर्थी निमित्त श्री क्षेत्र राजूर गणपती येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी संस्थेच्या स्वामलकीच्या गोदामावर फराळाची सोय करण्यात आली.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक,संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर,बुलडाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कोमलताई झंवर व संस्थेचे सरव्यवस्थापक कैलासजी कासट यांच्या प्रेरणेने तसेच संस्थेच्या



विभाग सिल्लोड चे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र राजूर गणपती येथे पायी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी फराळ व पिण्याच्या पाण्याची सोय संस्थेच्या विभाग सिल्लोड अंतर्गत शाखा सिल्लोड स्वमालकीच्या गोदाम येथे दि.११ सोमवार रोजी करण्यात आले होते.यासाठी ५० किलो फराळी चिवडा व २००० राजगिरा लाडू उपलब्ध करण्यात आले होते.यावेळी शेकडो भाविकांची उपस्थिती होती.यावेळी विभाग सिल्लोड चे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी,विभागीय लेखा परीक्षक अनिल बोर्डे,शाखा सिल्लोड वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे,शाखा व्यवस्थापक योगेंद्र डापके,शाखा शिवनाचे शाखा व्यवस्थापक नंदकुमार भालेराव,शाखा भराडी शाखा व्यवस्थापक विश्वास दळवी,लिपिक कर्मचारी शिवाजी चिंचोले,रुपेश कोरके,ईश्वर ठाले,गोदाम लिपिक गणेश सावळे,गणेश चव्हाण,अमित कुळकर्णी तसेच शिपाई पंकज कुलकर्णी,संदीप म्हस्के, दिगंबर पारवे,नंदलाल घुनावत व वाहन चालक मोहन सपकाळ आदी उपस्थित होते.

## एमजीएम विद्यापीठ आणि हयात पॅलेस यांच्यामध्ये सामंजस्य करार



छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : सहकार्य, सहयोग आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी महात्मा गांधी मिशन आणि हयात पॅलेस या दोन संस्थांमध्ये मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर आणि छत्रपती संभाजीनगर हयात पॅलेसचे महाव्यवस्थापक अमित जैन यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर, संचालक डॉ.कपिलेश मंगल, प्रा. पुष्पा गोरे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. या करारांतर्गत एमजीएम इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना हॉटेल उद्योगातील नव्या घडामोडींची माहिती मिळणार आहे. तसेच इन्स्टिटयूटचे प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे कौशल्याधारित प्रशिक्षण, शिक्षण व संशोधनातील ज्ञान अद्ययावत होण्यास मदत होणार आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होणार आहे. दोन्ही संस्थातील सहकार्य व सहयोगामुळे संसाधनांचा अधिक प्रभावी वापर होईल आणि विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्याच्यादृष्टीने फायदा होईल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

## मेडिकव्हर हॉस्पिटलने जागतिक स्तनपान सप्ताह साजरा

छत्रपती संभाजीनगर : जागतिक स्तनपान सप्ताहाच्या एका अनोख्या आणि हृदयस्पर्शी समारंभात, छत्रपती संभाजीनगर मेडिकव्हर हॉस्पिटलने २० हून अधिक गर्भवतीसाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात गर्भवती महिलांना स्तनपान ,स्तनपानाचे महत्त्व व त्याचे फायदे याविषयी माहिती दिली गेली

कार्यक्रमात उपस्थित आरोग्य तज्ञांमध्ये डॉ. चंद्रशेखर चव्हाण (स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ), डॉ. जानकीदेवी बोराडे (स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ) , डॉ. राहुल गोसावी (बालरोग तज्ञ)यांचा समावेश होता. यावेळी गर्भवती महिलांना बाळाची योग्य काळजी कशी घ्यावी , बालकांकरीता स्तनपान कशाप्रकारे आवश्यक आहे याविषयी माहिती दिली गेली. स्तनपानामुळे बाळांना आवश्यक पोषक तत्वे आणि अँटीबॉडीज मिळतात, जे त्यांची प्रतिकारशक्ती वाढवतात आणि त्यांना संसर्गापासून संरक्षण देतात,तसेच ते मातांसाठी आरोग्यदायी फायद्यांवरही प्रकाश टाकला, ज्यामध्ये प्रसूतीनंतर जलद पुनर्प्राप्ती आणि स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाचा कमी धोका यांचा समावेश आहे.

मेडिकोव्हर हॉस्पिटलचे डॉ. दीपेन शाह म्हणाले, की, या कार्यक्रमाचा उद्देश एक उत्साही वातावरण तयार करणे आहे जिथे गर्भवती महिलांना स्तनपान , नवजात आणि मातृ आरोग्याचा पाया म्हणून स्तनपानाचे महत्त्व जाणून घेता येईल, याकरिता या कार्यक्रमाची आयोजन करण्यात आले होते













## हिमाचलमध्ये किन्नौर ढगफुटीने उध्वस्त; घरं-गाड्या पुरात गेल्या वाहून

किन्नौर : हिमाचल प्रदेशात निसर्गाने पुन्हा एकदा आपला प्रकोप दाखवला आहे. किन्नौर जिल्ह्यातील ऋषी डोंगरी खोऱ्यात झालेल्या ढगफुटीमुळे होजिस लुंगपा नाल्याला अचानक पूर आला. या पुरामुळे सतलज नदीच्या दुसऱ्या बाजूस चार जण अडकून पडले, तर एक व्यक्ती जखमी झाली. पुराचा जोर इतका प्रचंड होता की सीपीडब्ल्यूडीचा संपूर्ण कॅम्प वाहून गेला. घटनेची माहिती मिळताच, ट्रिपिक्स ब्रिगेडची बचाव पथके तात्काळ घटनास्थळी रवाना झाली. रात्रीच्या अंधारात, पाण्याच्या प्रचंड प्रवाहाशी झुंज देत आणि कठीण डोंगरी मार्ग पार करत त्यांनी अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. लोकांना रात्रभर सुरक्षित ठेवण्यासाठी पथकाने विशेष हाय अल्टिट्यूड ड्रोनचा वापर करून अन्न, पाणी आणि इतर जीवनावश्यक वस्तू पुरवल्या. दरम्यान, जखमी व्यक्तीला सुरक्षितपणे बाहेर काढून रेकाँग पेओ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. या बचाव मोहिमेत दाखवलेली तत्परता आणि धैर्य, नैसर्गिक संकटांमध्ये मानवी जीव वाचवण्यासाठी किती महत्त्वाची असते, याचे उत्तम उदाहरण ठरली.

हिमाचल प्रदेशात गेल्या काही दिवसांपासून निसर्गाचा कहर सुरू असून प्रशासन सतत सतर्क मोडवर आहे. किन्नौरमधील ढगफुटी आणि अचानक आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शिमला, लाहौल आणि स्पिती या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे.







## अग्रलेख...

# संख्यावाढीसोबत प्रतिमाही उजळावी..!

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ च्या बैठकीत राज्य पोलिस दलात शिपायांची १५,६३१ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या भरतीमध्ये २०२२ व २०२३ या वर्षांत संबंधित पदांची वयोमर्यादा ओलांडली असेल, तरीही त्यांना एकावेळची विशेष बाब म्हणून या भरतीसाठी अर्ज करता येणार आहे. या भरतीत पोलिस शिपाई १२,३९९, पोलिस चालक २३४, बँड्समन २५, सशस्त्र पोलिस शिपाई २,३९३, कारागृह शिपाई ५८० असा एकूण १५,६३१ पदांची भरती केली जाणार आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ५० हजार पोलिसांची भरती करण्यात आल्याची माहिती आहे. तरीसुद्धा १२ कोटी ८३ लाख लोकसंख्येच्या महाराष्ट्रात सध्या १ लाख ९८ हजार ८७० पोलिस आहेत. या आकडेवारीनुसार १ लाख लोकसंख्येमागे केवळ १६९ पोलिस आहेत, जे १८८ असायला हवे आहेत. संयुक्त राष्ट्र मानकानुसार ४५० लोकांमागे १ पोलिस असायला हवा आहे. भारतात हे प्रमाण फार कमी आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाहिले तर, भारतातील पोलिस-लोकसंख्या गुणोत्तर कमी आहे. अमेरिकेत १ लाख लोकसंख्येमागे ११६ पोलिस, तर रशियात ५२२ पोलिस आहेत. भारतात हे प्रमाण सरासरी १४० आहे आणि महाराष्ट्रात ते त्यापेक्षा अधिक म्हणजे १६९, म्हणजेच राष्ट्रीय सरासरीपेक्षा किंचित जास्त आहे. मात्र, वाढत्या गुन्हेगारी आणि सामाजिक आव्हानांच्या पृष्ठभूमीवर हे प्रमाण अपुरे आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचा पोलिसांप्रति दृष्टिकोन संमिश्र आहे. एकीकडे, पोलिस हे कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षक मानले जातात, तर दुसरीकडे, अनेकदा त्यांच्या भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि असंवेदनशीलतेचे आरोप होतात. सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदविताना तक्रारदारांना लागू होणारी कायद्याची कलमे सुचवावी लागतात, असे आपण अनेकदा पाहतो किंवा ऐकतो. तसेच, बलात्कार आणि महिलांवरील अत्याचार प्रकरणांमध्ये पोलिसांची उदासीनता आणि कायद्याविषयी अज्ञान यामुळे तक्रारी नोंदविण्यात विलंब होतो, ज्यामुळे सर्वसामान्यांचा विश्वास कमी होतो. महाराष्ट्रातील सामाजिक आणि आर्थिक वैविध्यामुळे पोलिसांप्रति लोकांचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. शहरी भागांमध्ये, विशेषतः मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्येसुद्धा शिक्षित आणि मध्यमवर्गीय लोक पोलिसांशी संपर्क साधण्यास कचरतात. कारण त्यांना पोलिसांशी संबंधित प्रक्रिया त्रासदायक आणि वेळखाऊ वाटते. ग्रामीण भागात पोलिसांशी संपर्क हा बहुतांशी स्थानिक पोलिस ठाण्यापुरता मर्यादित असतो, जिथे स्थानिक प्रभाव आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे पोलिसांची कार्यक्षमता कमी होते. एकदा इंग्लंडमध्ये गेलेल्या एका भारतीयाने परतल्यानंतर एक किस्सा सांगितला होता. इंग्लंडमध्ये फिरत असताना एका निर्जन रस्त्यावर त्यांची कार बंद पडली. कारवाला मित्र आता काय करता येईल, याचा विचार करीत असतानाच एक पोलिस वाहन येताना दिसले. कारवाल्या मित्राला आनंद होऊन तो सुटकेचा निःश्वास सोडतो. पोलिस आल्यामुळे आता काही चिंता नाही, असेही म्हणतो. हा भारतीय नागरिक म्हणतो, भारतात असे नाही होणार. संकटात असलेल्यांना पोलिस येताना पाहून धडकीच भरेल. आता पोलिस काय विचारतील, कसे विचारतील, काय वागतील, अशा शंका भारतीयांच्या मनात येतील. पोलिस म्हणजे 'आ बैल मुझे मार..' असेच होते, ही आपल्या देशातील आणि राज्यातील पोलिसांची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. ही प्रतिमा बदलण्याची जबाबदारी आज आणि उद्याही प्रामुख्याने पोलिसांचीच आहे. पोलिस म्हटले की भारतीय माणसाच्या मनात कशी धडकी भरते, कशी धडधड वाढते. पोलिसांची भानगड नको असेच कधी कधी तर पोलिसांची मदतही नको, असे वाटते. सर्वसामान्यांना असे का वाटते, याचा विचार पोलिसांनीच करण्याची गरज आहे. यवतमाळातील एकाची स्कूटर चोरीला गेली. त्याने रितसर रिपोर्ट दिला. त्या दिवशीपासून दोन-तीन दिवस रोज, काय झाले, कसे झाले, केव्हा झाले, तुम्ही काय करत होता, अशा पोलिसी चौकशांमुळे तो बेजार झाला. चौथ्या दिवशी तो पुन्हा पोलिस ठाण्यात गेला. त्याने ठाणेदारांना विनंती केली, 'तुम्ही माझी स्कूटर शोधू नका. हवे तर मी तसे लिहून देतो. माझ्या स्कूटरचा विमा आहे. नियमाप्रमाणे मला पैसे मिळतीलच, पण माझ्या स्कूटरचा 'असा' तापदायक शोध थांबवा.' काही वेळा पोलिसी कार्यवाहीचा भाग म्हणून असे प्रकार होतही असतील, पण अशी प्रतिमा निर्माण होणे योग्य नाहीच. पोलिसांना त्यांच्या कामाच्या तुलनेत पैसे कमी मिळतात हे खरे असले, तरी अनेकांना तर काहीच मिळत नाही. तिथे त्यांचे तर वाहीपेक्षा कमी पगारात भागते. आपण पोलिस म्हणून काम करू लागलो आहोत तर ते स्वीकारायलाच हवे आहे. पूर्वी कसे असायचे म्हणतात की, एखाद्या प्रकरणी मला सवलत द्या, चौकशी मंदगतीने करा, त्रास देऊ नका, केस जमेल तेवढी ढिली करून ठेवा, अशा 'फेवर'साठी पोलिस पैसे मागायचे आणि संबंधित नागरिक त्यासाठी तयारही असायचा. पण गेल्या काही वर्षांत, तुमच्या तक्रारीवर चौकशी करायची असेल, तपास करायचा असेल, आरोपी शोधायचा असेल, जप्त केलेला माल परत हवा असेल, तर अशा पीडितालाच म्हणे पोलिसांना पैसे द्यावे लागतात. अर्थातच हे प्रमाण १० टक्केच आहे, असे गृहीत धरले तरी १० टक्केसुद्धा का, हा प्रश्न चुकीचा ठरत नाही. यातही सन्माननीय अपवाद असतीलच, हे मान्य. 'दहा अपराधी सुटले तर चालतील, पण एक निरपराध अडकायला नको' अशी पोलिसांची कार्यपद्धती असावी असे मानतात. पण यात अपराधी सुटण्याचे प्रमाणसुद्धा वाढायला नको, याचे भान पोलिसांनाच ठेवायचे आहे. चोर, लुटेरे, भामटे, जुगारी, चिडीमार, बलात्कारी, भाईगिरी अशांना दिल्यास सर्वसामान्यांना फारशी हरकत नसते. पण कधी कधी पोलिसी खाक्या दाखवण्यात सर्वसामान्य माणूस भरडला जात असेल तर त्याचा नकारात्मक संदेश समाजात जातो, याशाठीही पोलिसांनाच सतर्क राहावे लागणार आहे. पोलिसांची नेमकी कामे कोणती, हा प्रश्न जागरूक नागरिक आणि पोलिसांकडूनही विचारला जातो. चोऱ्या, दरोडे, मोडतोड, मारामारी, खूनखराबा, हल्ले, दंगली, अपघात, आगी, आपत्ती अशा प्रसंगी पोलिस हवेच असतात, नव्हे ती पोलिसांचीच जबाबदारी असते. आता यात सायबर गुन्हेगारीची भर पडली आहे. सुदैवाने सायबर विभाग पोलिसांनी वेगळा सुरू केला आहे. तसेच आर्थिक गुन्हेगारी संदर्भातही आहे. सायबर बाबतीत एकवेळ समजू शकतो. पण आर्थिक गुन्हेगारी, त्याचे प्रकार, त्यातील बारकावे, आम्ही कसे काय समजू शकतो किंवा याचाही आमचा नेमका अभ्यास कसा असू शकतो, असे प्रश्न पोलिसांतर्फे विचारले जातात. गावात होणाऱ्या अवैध बांधकामांच्या तक्रारीसुद्धा नगर पालिकांसारख्या संस्था पोलिसांकडे करून हात मोकळे करतात. अनेकदा तर पोलिसांकडे गुन्हा दाखल झाला असल्यामुळे आता आम्ही काय करू शकतो, असे सांगून आधी धुवून घेतलेले हात वर करण्याचा उद्योगही स्थानिक स्वराज्य संस्थांचे पाईक नेहमीच करत असतात. आता अवैध बांधकाम, नगररचना कायदा यांचाही अभ्यास आम्ही कसा आणि किती करावा, असे प्रश्न पोलिसवाले पत्रकारांना नेहमी विचारत असतात. व्हीआयपी सुरक्षा हा तर नेहमीच पोलिसांसाठी संवेदनक्षम विषय असतो. कोणाची, कशासाठी, किती वेळ, कोणत्या पद्धतीने सुरक्षा आम्ही पाहात राहायची, त्यात किती पोलिस किती दीर्घकाळ गुंतवून ठेवायचे, असेही पोलिसवाले नेहमीच विचारत असतात. मुंबईसारख्या महानगरातील ३२,१२१ पैकी ७,१२५ पोलिसांना निवासस्थान नाही. यामुळे पोलिसांवर मानसिक आणि शारीरिक ताण वाढतो, ज्याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. तसेच, रिक्त पदांमुळे विशेषतः गुन्हे शाखा, वाहतूक विभाग आणि दहशतवादविरोधी तुकडी यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता जाणवते. तरीही, महाराष्ट्र पोलिसांनी अनेकदा आपली कार्यक्षमता आणि कर्तव्यनिष्ठा दाखवली आहे. कोविड-१९ दरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेसाठी आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी उत्तम योगदान दिले. दहशतवादी हल्ले आणि मोठ्या गुन्ह्यांचा तपास करण्यात पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वाढीव पदांच्या भरतीने पोलिस आणि लोकांमधील विश्वास व सुसंवाद वाढेल आणि कायदा व सुव्यवस्था हे नुसते धोरण राहणार नाही, तर ते अनुभवाला येईल, असे व्हावे, इतकेच.


## तंत्रवेध

# अडचणीचा ठरतोय अमेरिकन व्हिसा

डॉ. दीपक शिकारपूर

अमेरिका म्हणजे संधीचे महाद्वार हा समज भारतीय युवा पिढीत १९८० नंतर प्रचलित झाला. उच्च शिक्षण आणि नंतर नोकरी-व्यवसाय अशा पद्धतीने हजारोंच्या संख्येने भारतीय तिथे रहिवास करू लागले. काही लोक त्याला 'ब्रेन ड्रेन' असेही म्हणतात. त्यासाठी लागणारे अत्यावश्यक घटक म्हणजे पासपोर्ट आणि व्हिसा. अमेरिकन एच-१बी व्हिसा हा कुशल देशी कामगारांना (विशेषतः तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील) अमेरिकेत तात्पुरत्या स्वरूपात काम करण्याची परवानगी देणारा एक नॉन-इमिग्रंट व्हिसा आहे. एच-१बी व्हिसाची मुळे १९५२ च्या इमिग्रेशन आणि नॅशनॅलिटी ॲक्टमध्ये आहेत. सुरुवातीला याला एच-१ व्हिसा असे म्हटले जात असे आणि तो असामान्य स्वरूपाच्या सेवा प्रदान करू शकणाऱ्या परदेशी व्यक्तींसाठी होता. १९८० च्या दशकात अनेक संगणक व्यावसायिक बी-१ (बिझनेस व्हिसा) वर काही कालावधीसाठी अमेरिकेत जाऊन काम करत. हजारोंच्या संख्येने भारतीय संगणक तज्ज्ञ तिथे पाठवले (याला बॉडी शॉपिंग असेही म्हटले जायचे). स्थानिक संगणक व्यावसायिकांपेक्षा भारतीयांचा पगार आणि इतर खर्च कमी असल्याने याचे प्रमाण वाढत गेले. १९९० मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश यांनी इमिग्रेशन ॲक्ट ऑफ १९९० वर स्वाक्षरी केली, ज्याने एच-१ व्हिसाचे विभाजन एच-१ए (नर्सेससाठी, जो आता अस्तित्वात नाही) आणि एच-१बी (विशेष व्यवसायांसाठी) मध्ये केले. याच कायद्याने एच-१बी व्हिसासाठी वार्षिक ६५,००० इतकी मर्यादा (कॅप) निश्चित केली. तसेच, नियोक्त्यांना कर्मचाऱ्याला किमान प्रचलित मजुरी देणे बंधनकारक केले.

१९९० च्या दशकात तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीमुळे कुशल कामगारांची मागणी वाढली. यामुळे १९९९-२००० मध्ये एच-१बी व्हिसाची मर्यादा १,१५,००० पर्यंत वाढवण्यात आली. नंतर ती १,९५,००० पर्यंत पोहोचली (जी २००३ पर्यंत लागू होती). २००० नंतर डॉट कॉम उद्योगाचा फुगा फुटल्याने तंत्रज्ञान क्षेत्रातील मागणी कमी झाली. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या दुसऱ्या कार्यकाळात (२००४-२००८) एच-१बी व्हिसाची मर्यादा पुन्हा ६५,००० पर्यंत आणली गेली, पण अमेरिकेतून मास्टर्स डिग्री घेतलेल्यांसाठी अतिरिक्त २०,००० जणांच्या व्हिसाचा कोटा ठेवण्यात आला. २००७ मध्ये अमेरिकेत आर्थिक मंदी सुरू झाली. यामुळे बराक ओबामा प्रशासनाने २००९ मध्ये एम्प्लॉय अमेरिकन वर्कर्स कायदा संमत केला. यामुळे सरकारने निधी दिलेल्या



कंपन्यांना एच-१बी व्हिसावर विदेशी कामगार भरती करण्यावर निर्बंध आले. डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असताना अमेरिका फर्स्ट धोरणामुळे एच-१बी व्हिसावर अनेक निर्बंध आले. २०२० मध्ये कोविड महामारीच्या काळात तर एच-१बी व्हिसा देण्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली होती. जो बायडन सत्तेवर आल्यानंतर एच-१बी व्हिसावरील बंदी हटवण्यात आली.

राष्ट्राध्यक्ष झाल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक धोरणात्मक बदल केले. त्यात प्रामुख्याने आयात शुल्क तसेच स्थानिक अमेरिकन व्यक्तींना प्राधान्य देण्याच्या धोरणाचा समावेश होता. त्यामुळे ते स्थलांतराच्या विरोधी आहेत. मेक्सिको सीमेवर कुंपण घालण्याची घोषणा याच प्रक्रियेचा भाग आहे. अमेरिकन व्हिसा प्रक्रियेत सध्या होणाऱ्या बदलांमुळे भारतीय नागरिकांवर मोठा परिणाम होत आहे. विशेषतः एच-१बी तांत्रिक कामगार व्हिसा, जन्मजात नागरिकत्व, व्हिसा मुलाखतीची अटी आणि नूतनीकरणाच्या प्रक्रियेमध्ये झालेल्या बदलांमुळे अनेक प्रवासी, विद्यार्थी आणि उद्योजक गोंधळात सापडले आहेत. एच-१बी व्हिसाची मागणी उपलब्ध व्हिसापेक्षा जास्त असल्याने दरवर्षी लॉटरी पद्धतीने अर्जदारांची निवड केली जाते. तथापि, सध्या अमेरिकेचे डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी लॉटरी प्रणालीऐवजी वेतनआधारित निवड प्रक्रिया लागू करण्याचा विचार करत आहे. नवीन प्रस्तावानुसार, एच-१बी व्हिसा वाटप करताना ऑक्युपेशनल एम्प्लॉयमेंट स्टॅटिस्टिक्सच्या वेतन स्तरांना प्राधान्य दिले जाईल. याचा अर्थ, ज्या पदांसाठी अधिक वेतन दिले जाते (लेव्हल ४) त्यांना प्राधान्य मिळेल, त्यानंतर लेव्हल ३, लेव्हल २ आणि शेवटी लेव्हल १ यांना. एच-१बी व्हिसाचे सर्वाधिक लाभार्थी असल्याने, या बदलांचा भारतीयांवर मोठा परिणाम होईल. सध्या लॉटरी पद्धतीने व्हिसा मिळत असल्याने करीअरची निवड व्हिसा मिळण्याच्या शक्यतांवर आधारित होती. नवीन प्रणालीमुळे उच्च वेतन असलेल्या पदांना प्राधान्य मिळेल.

अमेरिकेत जन्म झाल्यावर नागरिकत्व मिळविण्याच्या परंपरेत आता बदल प्रस्तावित आहेत. नव्या अटींनुसार जन्म घेणाऱ्या पालकांपैकी एक जण अमेरिकन नागरिक, ग्रीन कार्डधारक किंवा सैन्य सदस्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे एच-१बी किंवा ग्रीन कार्डवर असलेल्या भारतीय दाम्पत्यांच्या मुलांना नागरिकत्व मिळविण्यासाठी अधिक कष्ट करावे लागतील. व्हिसा अर्जात गेल्या पाच वर्षांमध्ये वापरलेल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सची माहिती देणे अनिवार्य झाले आहे. अर्ज मिळाल्यानंतरही दूतावास नियमित तपासणी करत आहे. गोपनीयतेबाबत चिंतेचा विषय निर्माण झाला असून चुकीच्या माहितीमुळे व्हिसा नाकारले जाण्याची शक्यता आहे. ड्रॉपबॉक्स पात्रता १२ महिन्यांपर्यंत कमी करण्यात आली आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नईसह मोठ्या शहरांमध्ये व्हिसासाठी प्रतीक्षा काळ ४२० दिवसांहून अधिक असून व्यावसायिक, शैक्षणिक आणि पर्यटन उद्दिष्टांसाठी प्रवास करणाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सद्यस्थितीत अमेरिकेत शिक्षणासाठी जाणे आणि शिक्षणानंतर तिथेच करीअर करणे, पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे, असे म्हणता येईल. केवळ एच-१बीच नाही, तर विद्यार्थी व्हिसा (एच-१बी व्हिसा) मिळविण्यातही काही अडचणी येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या नियोजित शैक्षणिक वर्षासाठी वेळेत अमेरिकेत पोहोचण्यात अडचण येते.

२१४(बी) कलमानुसार व्हिसा नाकारण्याचे प्रमाण काही प्रमाणात वाढले आहे. या कलमानुसार, तुम्ही तुमच्या मूळ देशाशी पुरेसे संबंध सिद्ध न करू शकल्यास व्हिसा नाकारला जाऊ शकतो. अनेकदा चांगले प्रोफाईल असलेल्या विद्यार्थ्यांनाही या कारणास्तव नकार मिळाल्याचे दिसून आले आहे. एच-१बी व्हिसा हा अनेकदा ग्रीन कार्ड मिळविण्याच्या दिशेने पहिले पाऊल मानले जाते. एच-१बी व्हिसा मिळविणेच कठीण झाले, तर भारतीय विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेत कायमस्वरूपी स्थायिक होण्याचा मार्ग अधिक लांबचा आणि अवघड होऊ शकतो. या आव्हानांमुळे अनेक भारतीय विद्यार्थी आता इतर देशांकडे वळताना दिसत आहेत. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि युनायटेड किंग्डमसारख्या देशांमध्ये शिक्षणानंतर नोकरीच्या अधिक सोप्या संधी उपलब्ध असल्याने भारतीय विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पर्याय ठरत आहेत. काहींनी जपान हा पर्याय निवडला आहे. दुसऱ्या बाजूने विचार करता भारतातही आता उच्च शिक्षणाचे उत्तम पर्याय उपलब्ध असून अनेक क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे शिक्षणासाठी परदेशीच जायला पाहिजे, असे काही बंधन नाही. अनेक परदेशी विद्यापीठे आता आपल्या देशात त्यांची ऑफशोर केंद्रे उभारत आहेत. नुकतेच नवी मुंबईमध्ये अशाच एका केंद्राचे उद्घाटन झाले. आज अनेक जागतिक उद्योग भारतात जीसीसी (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स) निर्माण करीत आहेत. फक्त महाराष्ट्रातच अशी ७०० हून अधिक केंद्रे विकसित झाली आहेत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# प्लॅस्टिकचं राज्य; दंड फक्त गरिबांना

प्लॅस्टिकवर बंदी असल्याचे सरकार रोज सांगते, तशा बातम्या झळकतात, मोहिमा राबविल्या जातात. पण या सगळ्याचं टोक जातं कुठं? रस्त्यावर बसलेल्या पानटपरीवाल्याकडे, फळ विक्रेत्याकडे, भाजी विकणाऱ्या हातगाडीवाल्याकडे. त्याच्या दुकानात प्लॅस्टिकची पिशवी सापडली की अधिकारी जमतात, फोटो काढतात, पिशव्या जप्त होतात आणि दंड वसूल होतो. पण त्या पिशव्या त्याच्याकडे आल्या कुठून? त्या कुठे बनतात? याचा विचार कोणी करतं का? खऱ्या प्रश्नांना भिडण्याऐवजी बळी दिला जातो तो नेहमीच गरिबाचा. आजही शहरात शेकडो प्लॅस्टिक उत्पादक कारखाने बिनधास्त सुरू आहेत. सरकारकडून परवानग्या दिल्या जात आहेत, उत्पादनं वाढवली जात आहेत. पिशव्या, डबे, बाटल्या, पॅकिंग मटेरिअल सगळं प्लॅस्टिकचं; आणि हे सगळं शहरातल्या झोपडपट्टीत तयार होतं का? नाही. हे सगळं तयार होतं श्रीमंतांचे कारखाने, मोठे यंत्रसामग्रीचे सेटअप, मोठे ब्रँड्स जिथे ना कुठला दंड पोहोचतो, ना कोणी धाड टाकतो. दुकानात मॅगी, बिस्किटं, तेल, मसाले, साखर हे सगळं प्लॅस्टिकमध्येच मिळतं. चिप्सपासून ते बर्फाच्या गोळ्यांपर्यंत, सगळं आजही प्लॅस्टिकमध्येच विकलं जातं. तरीही प्रशासनाला फक्त भाजीवाल्याच्या पिशवीचं 'प्रदूषण' दिसतं. ही सरकारची दृष्टी आहे की सोयीस्कर अंधत्व? नियम बनवतात सर्वसामान्यांसाठी, पण सूट देतात ते मोठ्या उद्योगांना. कारण गरीब कारवाईला सामोरा जातो, पण श्रीमंत कायद्याच्या पायऱ्यांवर पाय ठेऊन वर चढतो. हेच चित्र पावसाळ्यात दिसतं. रस्ते पाण्यात बुडतात. नाले तुंबतात. प्रशासन म्हणतं- नाल्यात प्लॅस्टिक गेलंय. पण विचार करा, ते प्लॅस्टिक आलं कुठून? रस्त्यावर पडलेली पिशवी त्या गरिबाने बनवली होती का? ती फेकली गेली, कारण ग्राहकाने वापरली आणि कुठेही टाकून दिली. ना त्याने पिशवी आणली, ना जबाबदारी घेतली.

आज लाखो जनावरे रस्त्यावर प्लॅस्टिक खाऊन आजारी पडतात. शेतकऱ्यांच्या जनावरांचे पोट प्लॅस्टिकने भरलेलं असतं. पण त्यांचं दुःख कोणी समजून घेतं? एकीकडे स्वच्छ भारताचा नारा, दुसरीकडे पोटात प्लॅस्टिक भरलेल्या गायी हे चित्र नुसतं विरोधाभासी नाही, तर लाजिरवाणं आहे. शहरात चहा प्लॅस्टिकच्या ग्लासमध्ये मिळतो, दूध प्लॅस्टिकच्या पिशवीत, औषधं प्लॅस्टिकच्या बाटल्यांमध्ये. प्लॅस्टिकचा शिरकाव आपल्या रोजच्या आयुष्यात खोलवर झालेला आहे; तरीही सरकार फक्त गरिबाच्या टपरीवर जाऊन सांगतं प्लॅस्टिक वापरू नका. हे खूप सोपं आहे. कारण त्याच्याकडे पर्याय नाही, वकील नाहीत आणि पाठीवर कोणाचं बळही नाही. जर खरंच सरकारला पर्यावरणाचं भान असेल, तर त्यांनी प्लॅस्टिकचं मूळ बंद करावं. उत्पादन थांबवलं की वापर थांबेल. पण इथे उलटच चित्र आहे. उत्पादन सुरूच आणि विक्रीवर दंड. हे धोरण ढोंगच आहे. लोकांना दोषी ठरवून मूळ प्रश्नावरून लक्ष हटवण्याचा सोपा मार्ग. नागरिक म्हणून आपल्यालाही विचार करावा लागेल. प्रत्येक वेळेस आपण दुकानात गेल्यावर पिशवी द्या म्हणतो, स्वतःकडून काही आणत नाही आणि नंतर त्या पिशव्या कुठेही फेकतो. त्या नाल्यात जातात, प्राण्यांच्या पोटात जातात; शेवटी आपल्या शहराच्या, पर्यावरणाच्या मरणात हातभार लावतात. आपण पिशवी वापरणं थांबवलं, पर्याय स्वीकारले, तर विक्रेताही पिशवी देणं थांबवेल. पण आपण विक्रेत्याला दोष देतो, सरकार त्याच्यावर दंड टाकतं आणि प्लॅस्टिक बनवणाऱ्या कंपन्या लाखोंचा नफा मिळवत मोकळ्या होतात. हे थांबवायचं असेल, तर सरकारने गंभीरपणे पहिलं पाऊल उचलावं लागेल ते म्हणजे कारखान्यांवर बंदी, उत्पादन थांबवणं आणि गरीब विक्रेत्याला स्वस्त दरात, सहज उपलब्ध होणारे पर्याय उपलब्ध करून देणं. पर्यावरणाच्या नावाखाली दंड वसुलीचं राजकारण थांबवायला हवं. स्वच्छतेचा नारा तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा न्याय सर्वांसाठी सारखाच असेल. आपण प्रत्येक वेळी सोयीचा विचार करतो, पर्यावरणाचा नाही. सरकारचे दुटप्पी धोरण अधिक त्रासदायक आहे. कारण ते नियम बनवतं, मोहिमा चालवतं; तरीही मूळ प्रश्नावर कारवाई करत नाही. आज एखाद्या गुटख्याच्या पुडीत तंबाखू कुठून येतो? कोण बनवतो तो सुगंधी पदार्थ? कधी त्यावर कारवाई होते? गुटखा विकणारा तर सापडतो, पण गुटखा बनवणारा मात्र अदृश्य असतो. हेच प्लॅस्टिकचं आहे. विकणारे सापडतात, बनवणारे नाहीत का? कारण ते श्रीमंत असतात आणि प्रशासन त्यांच्या उंबऱ्यावर जायला घाबरतं. फक्त गरिबावर नियम आणि श्रीमंताला सूट ही लोकशाही नाही, ही दिखाऊ व्यवस्था आहे. पर्यावरण सगळ्यांचं आहे, मग जबाबदारीही सगळ्यांचीच हवी.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र


# राहुल गांधींना झालंय तरी काय?

श्यामकांत जहागीरदार

बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षण अभियान आणि कथित मतचोरीच्या मुद्यावरून काँग्रेसच्या नेतृत्वातील विरोधी पक्षांनी संसदेपासून सडकेपर्यंत संघर्ष सुरू केला आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरीच्या मुद्यावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी या मुद्यावरून निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यापासून गांधी तसेही निवडणूक आयोगावर हल्ला चढवत आहेत. आपल्या पराभवाचे खापर आयोगावर फोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासाठी मतदार यादीतील कथित गैरप्रकार जबाबदार असल्याचा त्यांचा आरोप आहे.

राहुल गांधींचा हा प्रयत्न म्हणजे शाळेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने आपल्या अपयशासाठी शाळेच्या मुख्याध्यापकाला जबाबदार धरण्यासारखे आहे. मुख्याध्यापकाला जबाबदार धरताना तो विद्यार्थी आपण शाळेत नियमित आलो नाही, शिक्षक वर्गात जे शिकवत होते, त्याकडे आपण लक्ष दिले नाही तसेच घरी अभ्यास केला नाही, याचे भान ठेवत नाही; तशीच स्थिती राहुल गांधींची झाली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव हा काही काँग्रेस पक्षाचा पहिला पराभव नाही, तर सलग तिसरा पराभव आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेस पक्षाच्या पराभवाची मालिका सुरू झाली. विशेष म्हणजे या तिन्ही निवडणुकांत काँग्रेसचे नेतृत्व राहुल गांधीकडे होते आणि अजूनही आहे. मागील ११ वर्षांतील आपल्या पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडण्यापेक्षा त्यांनी काँग्रेस पक्षाच्या पराभवाचे आत्मपरीक्षण केले असते, त्यानंतर पक्षसंघटनेत सुधारणा करीत ती मजबूत केली असती, तर त्यांच्यावर आज ही वेळ आली नसती.

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि निर्णय प्रक्रियेवर राहुल गांधींचे काही आक्षेप असू शकतात. मात्र, ऊठसूट निवडणूक आयोगावर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा त्यांनी या मुद्यावर निवडणूक आयोगाशी समोरासमोर चर्चा करीत त्याचा एकदाचा सोक्षमोक्ष लावायला पाहिजे होता. निवडणूक आयोगाने याआधी एकदा राहुल गांधींना पत्र पाठवत चर्चेसाठी आमंत्रित केले होते, पण



आयोगाचे चर्चेचे निमंत्रण राहुल गांधींनी स्वीकारले नाही. आपण करीत असलेले आरोप खरे आहेत, त्याचे कागदोपत्री पुरावे आपल्याजवळ आहेत, याची खात्री होती, तर राहुल गांधी हिंमत दाखवून आयोगाकडे चर्चेसाठी का गेले नाही, याचे उत्तर त्यांनी देशवासीयांना देण्याची वेळ आली आहे.

मतचोरीच्या मुद्यावर निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर इंडिया आघाडीने राहुल गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढला. आयोगाने ३० नेत्यांच्या प्रतिनिधी मंडळाला चर्चेसाठी बोलावले होते. गांधींनी इंडिया आघाडीच्या ३० नेत्यांच्या प्रतिनिधी मंडळासोबत निवडणूक आयोगाशी कथित मतचोरीच्या मुद्यावर चर्चा करायला हवी होती, पण तसे काही त्यांनी केले नाही. कारण निवडणूक आयोगासमोरच्या चर्चेत आपला युक्तिवाद आणि भुसभुशीत पुरावे टिकणार नाहीत, याची राहुल गांधींना खात्री असावी. त्यामुळेच त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाणे टाळले.

राहुल गांधींनी सरकारवर आणि निवडणूक आयोगावरही आरोप करायला हरकत नाही; मात्र हे आरोप करताना त्यांनी ठोस पुरावे द्यायला पाहिजे. मतचोरीच्या आरोपावर निवडणूक आयोगाने त्यांना शपथपत्रावर आरोप करायला सांगताच राहुल गांधी रणछोडदासच्या भूमिकेत का जातात, हा सर्वांना पडलेला प्रश्न आहे. मतचोरीबाबत राहुल गांधींनी काँग्रेसची सत्ता असलेल्या कर्नाटकातील बंगळुरू लोकसभा मतदारसंघातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण दिले आहे. विशेष म्हणजे या मुद्यावरून कर्नाटकचे बडतर्फ सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांनी आपल्याच पक्षाच्या सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. मतपत्रिकेचा हा घोटाळा काँग्रेस सरकारच्या उपस्थितीत आणि देखरेखीत झाल्याचा घरचा अहेर राजन्ना यांनी केला. यामुळे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी त्यांची आपल्या मंत्रिमंडळातून हकालपट्टीही केली.

राहुल गांधी आणि विरोधी पक्षनेते या पदाबद्दल पूर्ण आदर बाळगून असे म्हणावेसे वाटते की, राहुल गांधींना विरोधी पक्षनेते म्हणून आपला पाहिजे तसा प्रभाव पाडता आलेला नाही. विरोधी पक्षनेता सभागृहात बोलायला उभा झाल्यावर सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांना घाम फुटतो. याचा अनुभव भाजपाच्या राजवटीत काँग्रेसच्या अनेक मंत्र्यांनी घेतला आहे. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, अरुण जेटली आणि सुषमा स्वराज यासारख्या भाजपाच्या अनेक दिग्गज नेत्यांनी विरोधी पक्षनेतेपद सांभाळले आहे. त्या पदाचा आब आणि प्रतिष्ठा जपली आहे. मात्र, लोकसभेत विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी बोलायला उभे राहतात, तेव्हा कोणीच गंभीर नसतो. सभागृहातील राहुल गांधींची वागणूक ही अनेक वेळा बालिशपणाची असते. आपल्या विदुषकी चाळ्याने ते सदस्यांचे मनोरंजन करतात, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

स्वातंत्र्य आंदोलनात लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी इंग्रजाविरुद्ध, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का' असा जहाल अग्रलेख लिहिला होता. किमान असा प्रश्न विचारताना सरकारला डोके आहे, पण ते ठिकाणावर नाही, असे त्यांनी गृहीत धरले होते. पण राहुल गांधींच्या बाबतीत तर असा प्रश्नही विचारता येत नाही. कारण असा प्रश्न विचारण्यासाठीही आधी किमान डोके असावे लागते. डोके असेल तर ते ठिकाणावर आहे का, असा दुसरा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे आपण राहुल गांधींच्या मागे फरफटत का जात आहोत, याचा विचार इंडिया आघाडीतील पक्षांनी करण्याची वेळ आली आहे.

मोदीद्वेषातून राहुल गांधी आंधळे झाले आहेत, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. दुसऱ्याची रेघ छोटी करून आपण मोठे होऊ शकत नाही तर दुसऱ्याची रेघ छोटी करण्यापेक्षा आपली रेघ ही मोठी करायची असते.

निवडणूक आयोग चुकीचे वागत असेल तर आवाज उठवला पाहिजे, आयोगाच्या चुकीच्या वागणुकीबाबत काही ठोस पुरावे असतील तर 'हा सूर्य हा जयद्रथ' केला पाहिजे. पण निवडणूक आयोगासारख्या संवैधानिक संस्थेवर खोटे आणि दिशाभूल करणारे आरोप करत जनमानसात त्यांच्याबद्दल संशयाचे वातावरण निर्माण करणे राहुल गांधींना शोभत नाही. आयोगाची विश्वसनीयता संकटात आणण्याच्या प्रयत्नात राहुल गांधी जनमानसातील स्वत:चीच विश्वनीयता कमी करून घेत आहेत, असे म्हणावेसे वाटते. त्यामुळे राहुल गांधींना झालंय तरी काय, असा प्रश्न सगळ्यांनाच पडला आहे.

९८८१७१७८१७

### अखंड मातृभूचे स्मरण

देशाच्या अखंडतेचे रक्षण करण्यासाठी त्याग आणि परिश्रम करण्याची स्फूर्ती देणारा अखंड मातृभूमीचा विचार आज कोठेही आढळत नाही. तडजोड करण्याची वृत्तीच सर्वत्र बळावली आहे. मातृभूमीवर आक्रमण करणाऱ्यांना तो भूभाग देऊन टाकून शांतता खरेदी करण्याच्या वृत्तीने लोकांना ग्रासून टाकले आहे. शत्रूच्या ताब्यात असलेल्या आपल्या भूप्रदेशाची आठवण हळूहळू बुजत चालली आहे. कैलास व मानसरोवर या आपल्या पवित्र तीर्थक्षेत्रात प्रवेश करण्यास आपल्याला प्रतिबंध आहे. जिच्यावरून आपल्याला हिंदू व हिंदुस्थान ही नावे प्राप्त झाली. त्या पवित्र सिंधू नदीत स्नान करण्याचे भाग्य आपल्याला आता राहिलेले नाही, याचे शल्य आपल्यापैकी किती जणांना आहे? एकेकाळी हिंदू तत्त्वज्ञानाच्या प्रसाराचे जागतिक केंद्र असलेले तक्षशिला आता आपल्या हाती नाही. हिरण्यकश्यपूपासून प्रल्हादाचे रक्षण करण्यासाठी झालेला भीषण नरसिंह अवतार ज्या मूलस्थानाने पाहिला तो मुलतान आज पुन्हा राक्षसी सतेच्या टाचेखाली गेला आहे. या सर्व आठवणी आपल्या अंत:करणात धगधगत आहे का? याबाबत आपण आपल्या स्वत:ला व उगवत्या पिढीला विशेष जपले पाहिजे, नाहीतर बाहेरील परिस्थितीच्या अत्याधिक दडपणामुळे भव्य कल्पनाचित्र हळूहळू पुसट होत जाईल आणि स्वाभिमानी वृत्ती नष्ट होईल. या देशाचा प्रत्येक कण त्याच्या रक्षणार्थ असंख्य वीरांनी व हुतात्म्यांनी सांडलेल्या रक्ताने पवित्र झालेला आहे. आज आपण असे म्हटले की, मुस्लिम किंवा चिनी आक्रमकांनी आपल्या मातृभूमीचा जो भूभाग हिरावून घेतला तो आमचा नव्हेच, त्यावर त्याचाच अधिकार आहे. तर त्याचा अर्थ एवढाच होईल की परिस्थितीशी टक्कर देण्याचे आपलं मनोधैर्य नष्ट झाले आहे, आणि आपल्या पराक्रमाची आपल्याला एवढी विस्मृती झाली आहे की, पराजयाला आणि मानहानीलाच आपण आपला गौरव समजू लागलो आहोत. मातृभूमीवरील उत्कट, सक्रिय, निरपवाद आणि ज्वलंत निष्ठा हा स्वतंत्र विकासोन्मुख व गौरवसंपन्न राष्ट्रजीवनाचा प्राण आहे.

'स्वार्थ साधना करण्याकरिता,
खंडित केली भारतमाता ।
शल्य अमुच्या सलते हृदया,
अखंड करण्याचे, उद्याला सत्य म्हणायचे'

**रमेश धारकर**/९४२२१४०८६५

## वाचक पत्रे

### संस्कृती विसरू नका

९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या 'तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध झालेला गौरी सरनाईक यांचा 'ती आणि तिचा पदर' हा लेख वाचनात आला. पदराचं अतिशय सुंदर, लयबद्ध आणि मार्मिक विवेचन या लेखातून त्यांनी केलं आहे. त्याबद्दल गौरीताईंचे अभिनंदन. ताई, मला हा लेख वाचल्यानंतर, जे प्रकर्षानं जाणवलं, ते शब्दबद्ध केल्याविना राहवलं म्हणून हा खटाटोप. साडीचा पदर स्त्रीसाठी केवळ साडीचा भाग नाही तर भावनेचं, संस्कृतीचं आणि सौंदर्याचं प्रतीक आहे, पण दुर्दैवाने म्हणावंसं वाटतं की आजकालच्या या उन्मत्त मुलींना हे कसं पटवून देणार की, हा एक पदर नाही तर ती आमची संस्कृती आहे आणि त्यात मायेचा खजिनासुद्धा दडलेला आहे. आईचा पदर जर डोक्यावरून फिरला ना तर त्यासारखं सुख नाही, समाधान नाही. पदर हा नैतिक समर्थन देणारा विश्वासू आधार आहे. पदराची सावली कोणत्याही वाईट प्रवृत्तीपासून स्त्रीचे रक्षण करते. पदरामध्ये माया, प्रेम आणि आपुलकीचे बंध असतात, पण आज मात्र हे बंध तुटून वेगळे झाले आहेत. उत्तान आणि उन्मत्त परिधानामुळे पदराची नितांत सुंदर कल्पना लोप पावत चालली आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये लोक तोकडे कपडे का वापरतात, याचा विचार कधी केला आहे का? भौगोलिक परिस्थितीनुसार शीतकटीबंधीय देशांमध्ये जवळपास हिवाळा आठ महिने असतो. उणे ५० डिग्रीपर्यंत तापमान बरेचदा जातं, सूर्यदर्शन होत नाही. परिणामी व्हिटॅमिन डीची कमतरता भासू लागते आणि म्हणूनच ज्यावेळी उन्हाळा असतो, त्यावेळी हेतुपुरस्सर तोकडे घातले जातात; जेणेकरून संपूर्ण शरीराचा संपर्क सूर्यप्रकाशासोबत यावा. त्यांच्या भौगोलिक परिस्थितीची ती गरज आहे. पण आमचं काय, अंधानुकरण करायचं, हा जणू वसाच घेतला आहे. एवढंच की काय, देवळातदेखील या वस्त्रांचं नकळत का होईना प्रदर्शन मांडलं जातं. त्यामुळे हल्ली बऱ्याचशा देवळांमध्ये पावित्र्य राखण्यासाठी म्हणून पारंपरिक वेशभूषेचा आग्रह धरला जात आहे. या मनोगताच्या माध्यमातून युवावर्गाला एवढंच आवाहन करू इच्छिते की, व्यक्तिस्वातंत्र्याच्या नादामध्ये संस्कृती विसरू नका. तोकडे कपडे उद्दामपणा दर्शवितात. संस्कृती टिकविणे आणि तिला वृद्धिंगत करण्यासाठी पदराची आज नितांत गरज आहे.

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

●● ●●

### भारतभूमी... पुण्यभूमी

आपला भारत महान आहे. जगात आपली भारतभूमी श्रेष्ठ आहे. भारतातच ऋषिमुनींनी जन्म घेऊन भारताला आध्यात्मिक ज्ञान दिले. आज भारताचे जगातील आध्यात्मिक रूप फार मोठे आहे. इथल्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी शेकडो परदेशी पाहुणे येत असतात. त्यांना एक कुतूहल आहे. भारतातच देवांनी मनुष्याचा जन्म घेऊन पापीजनांचा नायनाट केला. दृष्टांचा नाश केला. भारतीयांचे क्षत्रिय तेज पराक्रम महान आहे म्हणूनच शत्रू वाकड्या नजरेने बघण्याचे धाडस करू शकत नाही. भारतीय नागरिकांत माणुसकी आहे म्हणूनच जगातील सगळ्या धर्माचे लोकं इथे एका छताखाली नांदत आहे. म्हणूनच भारतभूमी ही पुण्यभूमी आहे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘आत्मा’ कार्यालयामार्फत येत्या रविवारी गंजगोलाई येथे रानभाजी महोत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** नागरिकांमध्ये वृक्ष लागवडीबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर शहरातील गंजगोलाई परिसरात रविवार, १७ ऑगस्ट रोजी ‘लातूर हरितोत्सव’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच याच ठिकाणी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अर्थात आत्मा कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव आयोजित केला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध प्रकारची रोपे आणि रानभाज्या विकत घेण्याची संधी मिळणार आहे.

‘लातूर हरितोत्सव’दरम्यान गंजगोलाई ते हनुमान मंदिर चौक परिसरात खासगी रोपवाटिकांचे स्टॉल्स लावले जातील. यामध्ये औषधी वनस्पती, शोभिवंत झाडे, परसबागेसाठी योग्य रोपे, फळझाडे, फुलझाडे, सेंद्रिय खते, कुंड्या आणि इतर आवश्यक साहित्य सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे. शहरातील नागरिकांना घराच्या अंगणात, गच्चीवर किंवा गॅलरीमध्ये लावण्यायोग्य झाडांची माहिती दिली जाईल. तसेच, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेताच्या बांधावर लावण्यासाठी योग्य फळझाडांच्या निवडीपासून लागवडीपर्यंत मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, महिला बचत गटांचे खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल्सही उभारले जातील. रानभाज्यांचे महत्व पटवून देण्यासाठी व विपणन साखळी निर्माण करण्यासाठी आयोजित रानभाजी महोत्सवात रानभाज्या व रानफळांची वैशिष्ट्ये, गुणधर्म व आरोग्यासाठी उपयोग, संवर्धन पध्दती, भाजीची पाककृती (रेसीपी) माहिती देण्यात येणार आहे. या रानभाज्या व फळे विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यात ज्यांच्याकडे रानभाज्या व रानफळे उपलब्ध आहेत, अशा शेतकऱ्यांनी आपल्या रानभाज्या व रानफळे विक्रीसाठी घेवून यावे. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी या महोत्सवामध्ये सहभाग नोंदवून रानभाज्यांची खरेदी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील पाचवी ते सातवी विभागात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त दि.१२ ऑगस्ट २०२५ या दिवशी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या स्पर्धेत एकूण ६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.त्यामध्ये १८मुले व ५१ मुलींचा सहभाग होता.या स्पर्धे साठी कांचन तोडकर, धम्मानंद लांडगे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले .या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला आणि रांगोळीतून विद्यार्थ्यांनी देशभक्तीचा संदेश दिला. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक अंजली निर्मळे, राम जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख मीरा चामवाड,स्पर्धा प्रमुख श्रीमती नंदा टेकाळे यांनी परिश्रम घेतले.

## लग्नाचे आमिष दाखवून विधवा महिलेवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** आरोग्य केंद्रात चालक पदावरून सेवानिवृत्त झालेल्या आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून एका ४० वर्षीय विधवा महिलेवर अत्याचार केल्याची घटना फेब्रुवारी २०२५ मध्ये घडली. याप्रकरणी लातूरच्या विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, लातूर येथील काझी मोहल्ला परिसरात राहणारा आरोपी बाबा मिरादार शेख हा रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात चालक पदावर काम करीत होता. नियतवयोमानानुसार तो सेवानिवृत्त झाला आहे. त्याने याच रुग्णालयातील कामगार असलेल्या विधवा महिलेला त्याच्या लातूर येथील घरी आणून तिला लग्नाचे आमिष दाखविले. तिच्यावर अत्याचार केला. ही घटना फेब्रुवारी २०२५ मध्ये घडली आहे. त्यानंतर या दोघांची भेटही झाली नाही. दरम्यान, सदर महिलेने सोमवारी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात येऊन आरोपी बाबा मिरादार शेख याने अत्याचार केल्याची तक्रार दिली. पोलिसांनी सदर महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी बाबा मिरादार शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक व्ही. एस. मुळे हे करीत आहेत.

## शहरातील पथ विक्रेत्यासाठी समिती सकारात्मक काम करेल :मानसी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** लातूर शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या शहर पथ विक्रेता समितीची बैठक महानगरपालिका स्थायी सभागृहात आयुक्त श्रीमती मानसी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

बैठकीत प्रथम उपस्थित सर्व सदस्यांनी आपली ओळख करून दिली आणि सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करण्यात आले. उपस्थित सदस्यांनी शहरातील फेरीवाले यांचेसाठी काही विशेष काम करावे, समिती सदस्य सुपर्ण जगताप यांनी शहरातील फेरीवाले यांच्या संदर्भात छत्रपती संभाजीनगर मनपाने केलेल्या कार्यवाहीचा विचार करून त्याप्रमाणे आपल्याला काही करता येईल का ते पाहावे असे सांगितले. इतर सदस्यांनी मागील बैठकीतील झोन केलेले याची माहिती द्यावी जेणेकरून त्यात काही सुधारणा सांगता येतील, असे मांडले. यावेळी आयुक्त यांनी समितीमध्ये नवीन सदस्य घेण्यात आलेले आहेत त्यात फेरीवाला क्षेत्र मध्ये निवडणुकीद्वारे व इतर अशासकीय संघटना, सेवाभावी संस्था या अशा विविध क्षेत्रामधून सदस्य घेण्यात आलेले आहेत त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने आपण शहरातील फेरीवाले यांचे प्रश्न व अडचणीबाबत त्यांचे मत घेऊ आणि पुढील बैठकीमध्ये समितीकडून सकारात्मक व धोरणात्मक निर्णय घेण्यात येतील, असे सांगितले.

# लातुरात नेहमीच वाहतुक कोंडी : नागरिक वैतागले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुना रेणापूर नाका, महात्मा गांधी चौक, गूळ मार्केट, बाभळगाव नाका, राजीव गांधी चौकात सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. बुधवारी दुपारी महात्मा गांधी चौक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर तब्बल पाऊण तास वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांसह वाहनधारकांना वाट काढण्यासाठी धडपडावे लागत आहे.

या ठिकाणची वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांच्या नाकेनऊ येत आहेत. पण, ही कोंडी काही केल्या फुटत नाही. या वाहतूक कोंडीमुळे लातूरकर वैतागले आहेत. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी याकडे लक्ष देऊन वाहतुकीची कोंडी फोडण्याबाबत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांसह वाहनधारकांतून होत आहे.

दिवसेंदिवस लातूर शहराचा विस्तार वाढत आहे. या वाढत्या विस्तारीकरणासोबतच लातुरात गेल्या काही वर्षांत वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे शहराच्या रस्त्यांवर मोठ्या संख्येने वाहने दिसून येतात. यात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. शिवाजी महाराज चौकात उड्डाण पूल असला तरी त्याचा फारसा वापर होत नाही. बहुतांश वाहनधारक नेहमीच्याच रस्त्याचा वापर करताना दिसतात. याच भागातून जुन्या रेल्वे लाइनचाही रस्ता गेलेला आहे. शहरातील मुख्य रस्ता, जुन्या रेल्वे लाइनचा रस्ता आणि रेणापूर रस्त्यांवरून वाहने एकाच वेळी शिवाजी महाराज चौकात येतात. त्यामुळे नेहमीच या चौकात वाहतुकीची कोंडी होत आहे. या चौकात सिग्नल लावण्यात आले आहेत. पण, त्याचा फारसा उपयोग होत नाही.

लाऊड स्पिकरच्या योजनेचाही उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. यासोबतच शहरातील जुना रेणापूर नाका, राजीव गांधी चौक, गूळ मार्केट, बाभळगाव चौक या ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. बुधवारी दुपारी महात्मा गांधी चौक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर तब्बल पाऊण तास वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे नागरिकांसह वाहनधारकांना वाट काढण्यासाठी कसरत करावी लागली.

### पोलीस अधीक्षक तांबे यांनी लक्ष द्यावे

बुधवारी दुपारी हनुमान चौकात एस.टी. बस आणि एका कारची धडक झाली. यानंतर दोन्ही चालकांमध्ये बाचाबाची सुरू झाली. दोन्ही वाहने रस्त्यावरच उभी होती. वाहतूक नियंत्रण शाखेचा कर्मचारी तेथे उपलब्ध नसल्याने महापालिका कार्यालय ते मध्यवर्ती बसस्थानकापर्यंत तब्बल पाऊण तास वाहतूक खोळंबली होती. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आतापर्यंतच्या आलेल्या वेगवेगळ्या पोलीस अधीक्षकांनी काही प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. पण, परिस्थिती ‘जैसे थे’च राहिली आहे. वाहतुकीची कोंडी काही केल्या फुटत नाही. त्यात सकाळी आणि सायंकाळी शासकीय कार्यालये भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळी ही कोंडी अधिकच होते. वाहतुकीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यासाठी नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी याकडे लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांसह वाहनधारकांतून होत आहे.



## दयानंद विज्ञान महाविद्यालयात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे जागतिक हत्ती दिनाचे औचित्य साधून विलुप्तप्राय जाती,नामशेष जाती,जल परिसंस्था व समुद्री परिसंस्था या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत बी.एस्सी.पदवी व एम.एस्सी.पद्व्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.सदरील स्पर्धा घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ. आर.व्ही.सोळुंके यांचेही मार्गदर्शन लाभले.या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.युवराज सारणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.मानवाच्या आनंदासाठी व येणाऱ्या पिढीसाठी निसर्गात राहणाऱ्या वन्य जीव संधारणाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे व मानवी कृती वाढल्यामुळे वन्य जिवांना आज धोका निर्माण झालेला आहे.

याप्रसंगी डॉ.रत्ना कीर्तने, डॉ. सुरज कोल्हे, डॉ.अमोल ठोसर, डॉ. राहुल मोरे, प्रतिका धरणे, मनाली आगलावे,बालाजी चित्ते, गोविंद सांगवे आदी उपस्थित होते.

## सुरक्षा रक्षकांची रुग्णाच्या पतीला मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल असलेल्या पत्नीला भेटण्यासाठी आलेल्या पतीला मंगळवारी ‘एमएसएफ’च्या सुरक्षा रक्षकांनी गेटवरच अडवून बेदम मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी विविध सामाजिक संघटना व पक्ष पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने अधीष्ठाता डॉ. उदय मोहिते यांची बुधवारी भेट घेऊन याप्रकरणी तत्काळ चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, त्यांना सेवेतून कमी करण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन दिले.



महाराष्ट्र सुरक्षा बल (एमएसएफ) यांच्याकडे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातील रुग्णांना व वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्याचे काम दिले आहे. मात्र, त्यांच्याकडून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अरेरावी आणि मारहाणीचे प्रकार घडत आहेत. असाच प्रकार मंगळवारी घडला. रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल असलेल्या पत्नीला भेटण्यासाठी आलेल्या पतीला या सुरक्षा रक्षकांनी बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. याच्या निषेधार्थ विविध सामाजिक संघटना व पक्ष पदाधिकाऱ्यांनी अधीष्ठाता डॉ. उदय मोहिते यांची बुधवारी भेट घेऊन निवेदन देत दोषींवर कारवाई करावी अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला. दरम्यान, याबाबत त्रिसदस्यीय समिती नेमून समितीच्या अहवालानंतर कारवाई करण्याचे आश्वासन डॉ. मोहिते यांनी शिष्टमंडळाला दिले. या शिष्टमंडळात सुनील बसपुरे, महादू रसाळ, अक्षय धावारे, अविराजे निंबाळकर आदींचा समावेश होता.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात ‘हर घर तिरंगा’ या उपक्रमांतर्गत त्रिदिवशीय ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी सकाळी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

शासनाच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने ‘हर घर तिरंगा’ या उपक्रमांतर्गत त्रिदिवशीय ध्वजारोहण, विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये प्रश्न मंजुषा, तिरंगा रांगोळी काढणे, देशभक्तीपर वक्तृत्व स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी सकाळी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## भादा परिसरातील जनतेनी पहिल्यांदाच अनुभवला आमदारांचा जनता दरबार

### अडवणूक नव्हे तर सोडवणूक करा: आ. कराड यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या अडीअडचणी, वेगवेगळे प्रश्न आणि समस्या लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्यासमोर भादा सर्कल मधील नागरिकांनी जनता दरबारच्या माध्यमातून मांडल्या.

या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत जे शक्य आहेत ते प्रश्न जागेवरच सोडविले. इतर प्रश्नांबाबत सामान्यांची महिनाभरात आडूवणूक नाही तर सोडवणूक करावी अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना आमदार महोदयांनी दिल्या. आजपर्यंत कधीही सहजपणे आमदारांना भेटता आले नव्हते, प्रश्न मांडता आले नव्हते मात्र भादा सर्कल मधील सर्वसामान्य जनतेला पहिल्यांदाच आमदाराचा जनता दरबार आणि रमेशअप्पांच्या माध्यमातून माणसातला आमदार अनुभवता आला. तब्बल साडेपाच तास सुरू असलेल्या या जनता दरबारातून प्रश्नाची सोडवणूक झाल्याने अनेकांना मोठे समाधान मिळाले.

सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्या त्यांच्याशी संवाद साधता यावा यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारला भादा जिल्हा परिषद मतदार संघातील जवळपास सर्वच २७ गावासह वाडी वस्तीतील नागरिकांनी सहभाग घेऊन वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यांचा पाढाच वाचला.

यावेळी औश्याचे तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी आनंद निरगणे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, मंडळ अध्यक्ष उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, पद्माकर चिंचोलकर, भाद्याचे सरपंच बालाजी शिंदे, राजकिरण साठे, अभिषेक आकनगिरे, बालाजी साळुंके, सोमनाथ पावले आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होती. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या १५ - १६ वर्षात आमदारांना गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना भेटता आले नाही, आपले प्रश्न अडीअडचणी मांडता आल्या नाहीत. मात्र ज्यांनी आपल्याला भरभरून आशीर्वाद दिले त्यांचे आपण देणे लागतो या भावनेतून लातूर ग्रामीण मतदार संघातून निवडून आलेले आमदार रमेशआप्पा कराड यांनी सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका घेऊन, त्याच्या अडीअडचणी, प्रश्न समजून घेण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या जनता दरबारला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

# शक्तिपीठ महामार्ग होऊच देणार नाही

### आज बाधित शेतकऱ्यांच्या बैठकीत ठरणार आंदोलनाची पुढील दिशा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ ऑगस्ट -** मागील काळात लातूर जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण राज्यात महामार्ग झाले आहेत. गरज नसताना केवळ आर्थिक हव्यासापोटी, कोणाचा तरी ड्रीम प्रोजेक्ट म्हणून शेतकऱ्यांवर लादलेला शक्तिपीठ महामार्ग कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही. यासाठी १५ ऑगस्ट रोजी बाधित शेतकऱ्यांची मुरुड अकोला येथे माजी मंत्री आमदार अमित देशमुख, माजी आमदार धीरज देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली असून, या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी बुधवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



राज्यातील ज्या भागात, १२ जिल्ह्यातील ज्या शिवारातून शक्तिपीठ महामार्ग जात आहे त्या शेतात शेतकरी तिरंगा झेंडा लावून शक्तिपीठ महामार्ग आम्हाला नकोच, असा संदेश सरकारला देण्यासाठी, तिरंगा झळकतोय आमच्या शेतात, शक्तिपीठ नको आमच्या वावरात, हे अभिनव आंदोलन करण्यात येणार आहे. सदरचा निर्णय शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात आला असून, १२ जिल्ह्यांमध्ये स्वातंत्र्यदिनी हे आंदोलन करण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून लातूर जिल्ह्यातील २३ गावांतील शेतकरी एकत्रित येऊन शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता लातूर तालुक्यातील मुरुड अकोला येथे या महामार्गासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली असून, यावेळी पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार असल्याची माहिती साळुंके यांनी दिली. शक्तिपीठ महामार्ग तयार करण्यात यावा अशी कोणाचीच मागणी नाही, हा प्रस्तावित महामार्ग जुन्या समृध्दी महामार्गाच्या बाजूनेच जाणारा आहे. त्यामुळे याची आवश्यकता नसताना याचा अट्टाहास का, शेतकऱ्यांना कवडीमोल किंमत देऊन कोणाचा तरी ड्रीम प्रोजेक्ट म्हणून महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकऱ्यांवर हा रस्ता लादण्यात आला आहे. गेल्या अकरा वर्षांत सर्वात मोठा भ्रष्टाचार हायवे तयार करण्यात झाला असल्याचा आरोप साळुंके यांनी केला. यावेळी शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोजणीच्या पहिल्या टप्प्यात आम्ही मोजणीस विरोध केला आहे, आता काँग्रेसच्या नेतृत्वात हा लढा लढला जाणार असल्याचे सांगितले. यावेळी काँग्रेस पक्ष आणि संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रेडबस आता वाजवी दरातील हॉटेल सेवेतही

मुंबई : रेडबस या जगातील सर्वात मोठ्या ऑनलाइन बस तिकिटिंग व्यासपिठाने रेडबस हॉटेल्स ही नवी सेवा सुरू करत असल्याची घोषणा केली आहे. लाखो भारतीय प्रवाशांना वाजवी दरातील राहण्याची सोय पुरवणारी सेवा यामुळे त्यांच्या ताफ्यात जमा झाली आहे. या धोरणात्मक निर्णयासह देशातील वाजवी दरातील सेवा इच्छिणाऱ्या आणि अनुभवांवर भर देणाऱ्या प्रवाशांच्या वाढत्या संख्येचा 'एकथांबा प्रवासी साथीदार' ही आपली ओळख रेडबस अधिक दृढ करत आहे. रेडबसवर असलेला विश्वास आता वाजवी दरातील हॉटेल विभागाशी जोडला गेला आहे.










## आयबीएमचे नवीन इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर सुरु

छत्रपती संभाजीनगर - आज, आयबीएम (आयबीएमः एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील.












# जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाच्यावतीने तिरंगा रॅली

## हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरीत तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद, हर घर तिरंगा लावण्याचे आवाहन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ ऑगस्ट**

शासनाच्या हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी आदी ठिकाणी भारतीय जनता पक्षाच्यावतीने तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

हिंगोली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यापासून तिरंगा रॅलीला सुरूवात झाली. यावेळी ऑपरेशन सिंदूरची माहीती देण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुभाष लदनिया, कांता गुंडेवार, सखाराम मुटकुळे, ओबीसी सेलच्या रजनी पाटील, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, महेश शहाणे, बाळासाहेब नाईक, जिल्हा सरचिटणीस सुनीता मुळे, उमेश नागरे, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष शशीकांत वडकुते, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, मनोज शर्मा, संतोष टेकाळे, पद्माकर नायक, विकी जैन, आशिष शर्मा, ओम कोटकर, माजी नगराध्यक्षा अनिता सुर्यतळ, ॲड राजेश गोटे, माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, कैलास शहाणे, अमित रूहीटीया, शहराध्यक्षा क्रिष्णा रूहीटीया, शिवशंकर वाबळे, नारायण खेडेकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय ढोके, माजी जिल्हा उपाध्यक्ष राजु यादव, संजय खंडेलवाल, माजी सभापती उत्तमराव जगताप, वंदना इंगळे, शाम खंडेलवाल, बाबा घुगे, ॲड अमोल जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शहरातील व्यापरी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी कै विठ्ठलराव घुगे शाळेसह इतर शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनी रॅलीत हातामध्ये तिरंगा घेवून सहभागी झाले होते. शहरातील गांधी चौक, महावीर चौक, इंदिरा गांधी चौक, जवाहर रोड या प्रमुख मार्गावरून तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी भारत माता की जय च्या घोषणा देण्यात आल्या.




औंढा नागनाथ शहरात भाजपा पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली काढली. तिरंगा रॅली ही हुतात्मा स्मारक येथून औंढा हिंगोली रोड, कासार गल्ली, डॉ.हेडगेवार चौक,मुख्य बाजारपेठ, नवीन बसस्थानक मार्गे नागनाथ मंदिरा जवळील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर पूर्णाकृती पुतळ्यापर्यंत तिरंगा रॅली काढली. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तिरंगा रॅलीचा समारोप करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर घराघरात तिरंगा ध्वजाचे उत्साहात स्वागत करावे. स्वातंत्र्याचा आनंद सर्वत्र पोहचावा. सर्व नागरिकांमध्ये स्वातंत्र्य दिनाचे चैतन्य दरवळत रहावे. यासाठी भाजपा पक्षाच्यावतीने हर घर तिरंगा रॅली शहरातून काढली. यावेळी नागरिक व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या आणि विकसित भारताचे गौरव करणाऱ्या घोषणा दिल्या. हर घर तिरंगा रॅलीमध्ये भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, उपजिल्हाध्यक्ष सखाराम इंगळे, तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, शहरध्यक्ष बबन सोनुने, तालुका सरचिटणीस गणेश पाटील, अँड एस एस कदम, अँड गणेश ठाकूर, विलास काळे, अनिल भांडे, नवनाथ देशमुख, प्रा.गजानन कुटे, सुधाकर सावळे, माधव वानखेडे, संजय लोंढे विजय पडोळे, सतीश यादव, मंगेश गुरव, गजानन सानप दिगंबर गिरी, प्रकाश पोले, सिद्धबाराव करे, देवराव पोले, कचरू शेळके, शिवाजी हाके, माधव वानखेडे अमर बिदारे, प्रकाश सोळंके, विनायक टोम्पे, गजानन हनुमते यांच्यासह भाजपा पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच औंढा तालुका व शाळेचे विद्यार्थी, शहरातील नागरिक सहभागी होते. हर घर तिरंगा रॅलीचे भाजपा औंढा तालुक्याच्यावतीने आयोजन करण्यात आले होते. या तिरंगा रॅलीसाठी भाजपा तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे व शहराध्यक्ष बबन सोनुने सह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## हिंगोली जिल्हा दुध उत्पादनात स्वयंपूर्ण व्हावा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १४ ऑगस्ट**



जिल्ह्यात दररोज ३० हजार लिटरपेक्षा जास्त दूध बाहेरून येत असल्याने आता शेतकऱ्यांनी सामूहिक प्रयत्न करून हिंगोली हा दुधात स्वयंपूर्ण व निर्यात करणारा जिल्हा व्हावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सखाराम खुणे, तहसीलदार शारदा दळवी, शासकीय डेअरी मिल्क अधिकारी शिवाजी गिनगिने, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक सुजीत झोडगे, बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक शालिकराम जाधव, तसेच हेरिटेज फूड्स लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी व विविध मान्यवर उपस्थित होते.

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे येथील रोकडेश्वर मंगल कार्यालयात हेरिटेज दूध उत्पादक शेतकरी मेळावा पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जनावरे पाळून दुग्ध व्यवसायाकडे वळावे, शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन दूध उत्पादन वाढवावे. बँकांनीही शेतकऱ्यांना आवश्यक कर्जपुरवठा करावा आणि पशुसंवर्धन विभागाने आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक सुजीत झोडगे यांनी शेतकऱ्यांना दूध उत्पादनासाठी सर्व बँका मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त शिवाजीराव खुणे यांनी सकस व संतुलित आहार, हिरवा व वाळलेला चारा देऊन जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्याचे मार्गदर्शन केले. वसमत तहसीलदार शारदा दळवी यांनी वित्तपुरवठा करताना सिबिल रेकॉर्डसोबतच शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष क्षमतेलाही प्राधान्य देण्याचे आवाहन बँकांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन रमेश चेंडके यांनी मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर वानखेडे व साईनाथ शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले.



**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलिस दलाच्यावतीने राष्ट्रध्वजाला सलामी देण्यासाठी रंगीत तालीम करतांना पोलिस दलातील अधिकारी, कर्मचारी दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पालकमंत्री नरहरी झिरवाळ हिंगोली दौऱ्यावर



हिंगोली- राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे १५ ऑगस्ट रोजी हिंगोली दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह नांदेड येथून त्यांचे हिंगोलीकडे प्रयाण. ८.४५ वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे आगमन व राखीव. सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे आगमन. ९.०५ वाजता भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थिती. १० वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे आगमन व राखीव. सकाळी १०.१५ वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथून ते नांदेडकडे प्रयाण करतील. पालकमंत्र्यांचा हा दौरा केवळ अवघा दीड तासांचाच आहे. त्यांच्या धावत्या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील प्रश्न ते कसे सोडवणार असा सवाल नागरिकांमधून होत आहे.

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १४ ऑगस्ट**



शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दि १४ मार्च २०२४ रोजी शासन निर्णयानुसार नियमित सेवेत समावेशन करण्याचा जीआर काढला परंतु सव्वावर्ष उलटूनही अद्याप अंमलबजावणी न झाल्यामुळे येत्या १९ ऑगस्ट पासून सर्व कंत्राटी कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करणार असल्याचा इशारा संघटनेच्यावतीने निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

शासन निर्णयानंतरही राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना अद्याप नियमित सेवेत समावेशन करण्यात आले नाही. मागील दहा ते पंधरा वर्षापासून कंत्राटी कर्मचारी समावेशन होईल या आशेवर काम करीत आहेत. उत्कृष्ट आरोग्य सेवा देत आहेत. परंतु त्यांच्या मागणीची दखल शासन घेत नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांना आंदोलनाचे हत्यार उपसावे लागत आहे. तत्काळ शासनाने कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समावेशन करावे अन्यथा १९ ऑगस्टपासून ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपाची सर्व प्रकारची कामे बंद करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर एस आर गारूडी, पी एस गिरी, एन ए बुर्से, एस एस करेवार, बी आर घ्यार, दिपक पवार, पी व्ही बेले, पी एल कुलकर्णी, बालाजी उबाळे, डॉ शारदा मेश्राम, जी व्ही आघाव, एन डी वाघमारे, शेख मुनाफ, जी बी बोंगाणे, गणेश ठोके, राहुल मोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्हा कचेरीसमोर उपोषणाचा गराडा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ ऑगस्ट**

पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहन कार्यक्रमासाठी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यानिमित्त जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेकजणांनी विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणे सुरू केली आहेत.

या उपोषणामध्ये सवड अंतर्गत खंडोबा पांदन रस्ता खुली करून देण्याची मागणीसाठी ग्रामस्थ, भाटेगाव येथील अंकुश राठोड यांनी खांद्यावर बैलाचे जू घेवून भूमी अभिलेख कार्यालयाकडून जमिनीची मोजणी दोन वर्षापासून न झाल्याबाबत उपोषण, आदिवासी पँथर संघटनेच्यावतीने महिलांनी विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आहे. माजी सैनिकाची पत्नी कौसल्याबाई दातार यांनी रमाई घरकुल योजनेच्या घोटाळ्याच्या चौकशीसाठी उपोषण, लोहरा वाणी येथील ग्रामस्थांनी सिंचन तलाव फुटल्यामुळे पिकांचे नुकसानभरपाई देण्यासाठी, वटकळी येथील अमृता शिंदे यांनी एचयुडीसी योजनेअंतर्गत तालुक्यात बसविलेल्या डीपीची चौकशी करण्यासाठी तसेच ५ वर्षापासून वीज जोडणी मिळत नसल्यामुळे उपोषण सुरू केले आहे. उपोषणार्थींनी कार्यालयास गराडा घातला आहे.

## शासनाच्या योजनेचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करा- मेघना बोर्डीकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ ऑगस्ट**

शासन सर्वसामान्य जनतेसाठी अनेकविध योजना राबवित आहे. या सर्व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवावेत, असे निर्देश राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघनाताई साकोरे- बोर्डीकर यांनी कळमनुरी व वसमत उपविभागाचा आढावा घेताना दिल्या.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार गजानन घुगे, शशिकांत वडकुते, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, तहसीलदार जीवककुमार कांबळे आदी उपस्थित होते. वसमत येथे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली रमेश, उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना राज्यमंत्री श्रीमती साकोरे- बोर्डीकर म्हणाल्या, महिला व बालविकास विभागामार्फत पीडित व गरजू महिला व बालकांसाठी बालसंगोपन योजना, सखी वन स्टॉप सेंटर, महिला हेल्पलाईन १८१, राष्ट्रीय पोषण अभियान यासह अनेक योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेची सर्वसामान्य लाभ मिळण्यासाठी प्रभावी जनजागृती करावी.

आरोग्य विभागांनी क्षयरोगमुक्त अभियानांतर्गत तपासणीचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे संशयित रुग्णांची तपासणीचे प्रमाण वाढवावे. त्यांना योग्य तो औषधोपचार करावा. अवयवदान पंधरवाडा, संजीवनी अभियान, आयुष्यमान भारत योजना, डेंग्यू-मलेरिया अभियान यासारखे विविध उपक्रमांची जनजागृती करुन सर्वसामान्य जनतेला आरोग्य सेवा उपलब्ध करुन द्यावी. 'ड्राय डे अभियान' राबवावा. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रक्तदाब व शूगरच्या गोळ्या मोफत वितरीत केल्या जातात. त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेला द्यावा. आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची जनजागृती करावी. तसेच अवैध गुटखा विक्रेत्यावर गुन्हे दाखल करावेत, हद्दपारीची कारवाई करावी, अशा सूचना दिल्या.

कळमनुरी उपविभागात सुरु असलेली रस्त्याची कामे दर्जेदार होतील, याची दक्षता घ्यावी. दर्जाहीन कामाची चौकशी करुन दोषीवर कारवाई करावी. ऊर्जा विभागामार्फत पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर पंप योजना, कुसूम योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी या योजनेसह नवीन वीज उपकेंद्राचे प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावेत.

जलजीवन मिशन योजनेंतर्गत प्रत्येक घरांना नळजोडणी झाली पाहिजे. त्याचबरोबर शाळा, अंगणवाड्यांनाही नळजोडणी द्यावी. जलजीवन योजनेची कामे दर्जेदार करावीत. पाण्याचा स्त्रोत तपासून जलजीवन योजनेची विहिरी घेण्यात यावीत. जलजीवन योजनेच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणेनी जलजीवन योजनेची कामे दर्जेदार व वेळेत करुन नागरिकांना पाण्याची सोय उपलबध करुन द्यावी. या कामात हयगय करणाऱ्या कंत्रादारावर कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकावे. याबाबत यंत्रणेने हयगय केल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल, असे निर्देश राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

स्वच्छ भारत मिशन अभियानांतर्गत प्रत्येक गावे हागणदारी मुक्त, ओडीएफ प्लस करावीत. तसेच गावात घनकचरा व्यवस्थापन, शाळेत व सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करावी. प्रत्येक गावात घंटागाडीची सोय झाली पाहिजे. यासाठी प्रत्येक गावातील ग्रामसेवक, सरपंच, जनता एकत्र करुन योजनेची माहिती द्यावी. त्यांच्यामध्ये जनजागृती करावी, अशा सूचना दिल्या.

स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रत्येक गावामध्ये हर घर तिरंगा व हर घर स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करुन त्याचा अहवाल सादर करावा. तसेच ज्या गावात स्वच्छतेच्या तक्रारी आहेत. त्या तात्काळ दूर कराव्यात. तसेच आदिवासी विकास विभागाने शासनाच्या विविध योजनेचा लाभ तळागातील लोकांना देण्यात यावा. यासाठी योजनेंची जनजागृती करावी.



प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांची अडवणूक होत असल्याची जनतेची तक्रार आहे. याबाबत शहानिशा करुन सर्वसामान्य लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळवून देण्यात यावा. तसेच ज्या लाभार्थ्यांना स्वत:ची जागा नाही अशा लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाल उपाध्याय योजनेतून जागा खरेदीसाठी अर्थसहाय देऊन त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ द्यावा, अशा सूचना दिल्या.

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, फळबाग लागवड योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचा लाभ तळागातील जनतेला उपलब्ध करुन द्यावा. तसेच शेतरस्त्याची, फेरफाराच्या प्रलंबित प्रकरणाची प्रकरणे तात्काळ निकाली काढावेत. तसेच राशन दुकानदाराना व जनतेला नियमित धान्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. याबाबत तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगून हे शासन जनतेचे शासन असून गतिमान आणि पारदर्शक आहे. त्यामुळे शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचविण्यात यावेत, असे निर्देशही श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी यावेळी दिले. कळमनुरी येथील बैठकीच्या शेवटी अवयदानाची शपथ घेण्यात आली. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, महिला व बालविकास मंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी वसमत येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात विविध विभागांचा आढावा घेतला. यावेळी ई-संजीवनी अभियानाचा आढावा घेतला. संशयित रुग्णांवर वेळेत उपचार करावेत. यासाठी वैद्यकीय अधिकारी यांच्या रात्रपाळीवर नियुक्त्या करण्याचे निर्देश दिलेत.

शेतकामासाठी जात असलेल्या गुंज येथील महिला मजुरांचा विहिरीत ट्रॅक्टर पडून एप्रिलमध्ये मृत्यू झाला होता. त्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी वाढीव गावठाणाचा प्रस्ताव मंजूर करण्याचे आदेश दिले. तसेच घरकुल लाभार्थ्यांना २ ब्रॉस मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचे निर्देशही दिले. शासकीय अधिकाऱ्यांनी गोरगरिबांची कामे सेवाभावातून पूर्ण करावीत व वेळेत योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. तसेच गरजू व पात्र नागरिकांना वेळेत रेशन कार्ड तात्काळ तयार करून देण्याचे औंढा नागनाथचे तहसीलदार हरिष गाडे यांना दिले.

यावेळी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना वीज सुरळीत करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना तत्काळ करण्याच्या सूचनाही राज्यमंत्री बोर्डीकर यांनी दिल्या. या बैठकीस विविध विभागाचे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विभाग प्रमुख उपस्थित होते.


तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025 हार्दिक शुभेच्छा
नुपुर शिक्षण संस्था जालना
एच.पी. एल. माध्यमिक विद्यालय कृष्णापुर
मुख्याध्यापक
* शुभेच्छुक *
सचिव


सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025 हार्दिक शुभेच्छा
F-21482
महाराष्ट्र शासन मान्य
U-dise No.: 27190502035
श्री किसनराव बहुद्देशीय शिक्षणसंस्था संचलित
एक्सलंट पब्लिक इंग्लिश स्कुल
*नर्सरी *ज्युनियर के.जी. *सिनियर केजी
*इयत्ता १ ली ते १२ वी (माध्यम : इंग्लिश / सेमी इंग्लिश)
संचालिका
सौ. रेखा चव्हाण मॅडम
9881338022, 9762722165
E-mail: rekhajadhav6837@gmail.com
पत्ता : निलजगाव फाटा, माऊली हॉस्पिटलजवळ, बिडकीन, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर


केज विधानसभा मतदारसंघाच्या
भाग्यविधात्या
स्व.डॉ. सौ.
विमलताई मुंदडा
यांना जयंती निमित्त
विनम्र अभिवादन!
आ.नमिता अक्षय मुंदडा
विधानसभा सदस्य, केज
@mundadanamita NamitaMundada NamitaMundada


तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025 हार्दिक शुभेच्छा
श्री.सद्गुरु कृपा कृषी सेवा केंद्र
* शुभेच्छुक *
श्री.विष्णु पा.भवर


तरुण भारत 2025
वर्धापन दिनानिमित्त
व स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
VIRAJ EYE & DENTAL HOSPITAL
डॉ. विक्रांत जयस्वाल
B.D.S., M.D.S. Orthodontics
Fellowship in
Dental Implantology
डॉ.राजेश्वरी चरडे जयस्वाल
उपलब्ध सुविधा
संपर्क : 0240-7964590, 9873598921


तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025
हार्दिक शुभेच्छा
भगवती विद्यालय
बिडकीन,ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर
सचिव
* शुभेच्छुक *
मुख्याध्यापक


तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025 हार्दिक शुभेच्छा
श्री मोहटादेवी विद्यालय
* शुभेच्छुक *
सचिव
श्री.महेश विजयराव पोरसे (प्राचार्य)
पत्ता: (म्हरोळा फाटा)ता.पैठण, जि.छ.संभाजीनगर.


सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025
हार्दिक शुभेच्छा
BLUE MOUNTAIN PRE-SCHOOL
NURSERY
JR.KG SR.KG
1ST TO 7TH
Our Facilities
•Sports Facilities •Computer Lab
•Science Labs •Playgrounds
•Music Room •Auditorium
•Art Room •Library
MOB: 9730032779 8087958286
Gut no: 68 Mharola Road, Chh. Sambhajinagar


सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025
हार्दिक शुभेच्छा
सरपंच
उपसरपंच
ग्रामसेविका
सन्माननीय ग्रा.पं. सदस्य
प्रशासकीय कर्मचारी
ग्रामपंचायत कार्यालय फारोळा
ता.पैठण. जि.छ.संभाजीनगर


सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025
हार्दिक शुभेच्छा
शिवसेना
* शुभेच्छुक *
काकासाहेब पा.टेके
(युवासेना जिल्हाप्रमुख छत्रपती संभाजीनगर)
मधुकर सोकटकर


तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या
2025 हार्दिक शुभेच्छा
श्री. प्रमोद शिंदे सर संचलित
अग्निपंख कोचिंग क्लासेस
* शुभेच्छुक *
प्रा.नवनाथ वांगर
प्रा.प्रमोद शिंदे
इ.५ वी ते १२ वी


सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य
दिनाच्या २०२५
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
लतिफ सेठ कुरेशी
उपजिल्हा प्रमुख रा.कॉं. पार्टी
(पं.स.सदस्य, बिडकीन)
युनुस खान अहेमद खान
मा.ग्रा.पं.सदस्य

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १३४ पाने : ८+४ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







जाहीरात संकलन : मधूकर अन्नेलवार किनवट

www.tarunbharat.net
तरुण भारत

# साहित्य-संस्कृती



निसर्गभान

# ब्रह्मकमळ



अतिशय थंड, अंग गारठवणारी हवा अंगावर झेलत आम्ही चालत होतो. साधारणपणे १४ ते १५ हजार फूट उंचीवर नेणारा हिमालयातील हेमकुंड साहेबचा हा ट्रॅक! चढण दमछाक करणारी असली, तरी आजूबाजूला असलेले बर्फाच्छादित पहाड आणि जमिनीवर अगदी छोट्याछोट्या रानफुलांची रोपं! त्यातल्याच एका तीन-चार फुलांच्या गुच्छांनी लक्ष वेधले. पिवळसर पोपटी पानांसारख्या नाजूक पारदर्शक दिसणाऱ्या आणि आतल्या फुलांना जपणाऱ्या कागदी पाकळ्यांची फुलं किंचितसा प्रकाश आत पोहोचेल एवढीच उघडी असणारी! हिमवृष्टीतही मुख्य फुलाच्या आतील तीनचार छोट्या फुलांचे संरक्षण व्हावे यासाठी निसर्गाने ही किमया केली आहे. प्रत्येक पाकळीच्या कडेला बारीक जांभळी लेस लावलेली! प्रत्येक फूलं म्हणजे नाजूकपणाची कमाल! बद्रीनाथ आणि केदारनाथच्या मंदिरात देवाला वाहतात, ते उत्तराखंडाचे राज्यपुष्प म्हणजेच हे सुरेख कोमल देवपुष्प- 'ब्रह्मकमळ'! कमळाच्या कळीसारखे दिसणाऱ्या अन् नाजूक सौंदर्याने मन मोहून घेणाऱ्या या फुलाने माझ्या मनात त्याची जागा कायम केली.

माझ्या मैत्रिणीला बागेची भारी हौस आहे. तिच्या बागेत तिने सर्व झाडांची सुबक आकर्षक मांडणी केली आहे. अशा या बागेत गोलसर कतरती लांब पानं आणि पानांच्या कतरत्या खोबणीतून फुटलेली आणखी पानं असं पानफुटीसारखं दिसणारं, अनाकर्षक छोटंसं रोपटं बघून मला आश्चर्य वाटले. तिच्या चाणाक्ष नजरेने माझ्या चेहऱ्यावरचे आश्चर्य लगेच टिपले आणि त्या झाडाला अतिशय लडिवाळपणे कुरवाळत तिने हे ब्रह्मकमळाचे झाड गं! अशी माझी त्या झाडाशी ओळख करून दिली. हिमालयात मी ब्रह्मकमळ पाहिले असल्यामुळे मला या झाडात रस वाटला नाही आणि मी ते विसरूनही गेले. आषाढात एक दिवस तिने रात्री गप्पांसाठी बोलावले. गच्चीवर कुंडीतल्या ब्रह्मकमळाला तीन कळ्या दिसल्या! पानांतून फुटलेली जाडसर हलक्या गुलाबी रंगाची इंग्रजी एसच्या आकाराची कमनीय दांडी आणि त्याला लागलेली गुबगुबीत लांबुळकी हळूहळू उमलत असलेली कळी! त्या जाड हिरव्या पानाला सुद्धा हा कळीचा भार अंमळ जडच होता. कळीला असलेले बारीक गुलाबीसर पाकळ्यांचे झिळमिळ कुंपण...आतल्या नाजूक शुभ्र पाकळ्यांना दुपारच्या उन्हापासून जपणारे! रात्री आठ-साडेआठपासून कळीची एकेक पाकळी उमलू लागली. आटीव मसाला दुधाचा आस्वाद घेत आम्ही ब्रह्मकमळ उमलण्याचा उत्सव साजरा केला. दुधाळ शुभ्र पाकळ्या एकमेकांपासून हलकेच विलग होत असताना मंद सुगंधांने आसमंत गंधाळले. फुलाच्या बाहेरच्या बाजूला १०-१२ लांब बारीक पाकळ्यांनी म्हणजे निदलपुंजांनी फेर धरला, त्यांच्या आत जरा रुंद कमळाच्या फुलांसारखे २०-२२ पाकळ्यांचे म्हणजे दलपुंजांचे दोन फेर होते. सगळ्यात आत परागकणांची दाटी! त्यात शुभ्र पांढऱ्या नाजूक काड्यांवर पिवळसर परागकणांचे पुंकेसर आणि एक चक्राकार स्त्रीकेसर! मोहक कमलपुष्पाची सुंदर रचना या ब्रह्मकमळाची! होय... महाराष्ट्रात यांनाच ब्रह्मकमळ म्हणतात.

• वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

**पाकळी देतेय् पाकळीला आधार**
**शुभ शुभ्र पावन फुल चक्राकार.**
**भासते हे सुदर्शन चक्र शुभंकर**
**स्मरतो पाठिराखा सखा चक्रधर.**

मी त्या नाजूक पाकळीला स्पर्श केला, अहाहा! काय मऊ-मुलायम पाकळी! अर्ध्या रात्री आम्ही ब्रह्मकमळ उमलण्याचा तो देखणा सोहळा अनुभवला आणि सर्व आप्त-मित्रांना व्हिडीओ कॉल करून हा निसर्गाचा नजराणा दाखवला. अतीव आनंदाचा चैतन्यदायी सोहळा!

मी गावाहून परत आले आणि नेहमीप्रमाणे बागेतून चक्कर मारली. अरे व्वा! मला बागेतल्या ब्रह्मकमळाच्या झाडाने एक सुखद आश्चर्याचा धक्का दिला. ब्रह्मकमळाच्या छोट्याशा झाडाला तीन कळ्या लागल्या होत्या. मी हरखले, लगेच माझ्या मैत्रिणीला फोन केला. रोज मोठी होणारी कळी बघणे. निरागस लोभसवाणी ती कळी, फुलण्याच्या आदल्या दिवशीचं तिचं मुग्ध यौवनातलं रूप मी नादखुळी झाले. पानफुटी किंवा निवडुंगाच्या एका प्रकारात मोडणारी ही एक वनस्पती आणि तिच्या अंगाखांद्यावर बहरणारी ही सात्विक, सोज्वळ आणि सुगंधी फुले चित्तवेधक शुभ्र मखमली मधुर सुगंधाची लयलूट करणारी ब्रह्मकमळे! कळीचे फुल होण्याचा तो चैतन्याचा उत्सव अनुभवायला हवा. मध्यरात्रीनंतर फूल कोमेजायला सुरुवात होऊन सकाळी पूर्ण कोमेजते. दुसऱ्या दिवशीचं त्याचं ते कोमेजलेलं, गळलेलं रूप बघून एक हळवी खिन्नता मनात दाटते. एका रात्रीचं आयुष्य पण किती देखणं! आमच्या बागेत चंद्रफुलाचा वेल आहे. तोही रात्रीच फुलतो. तीन-चार इंच लांबीच्या दांडीवर भरभर वाढणाऱ्या लांब पांढऱ्या कळ्या येतात आणि आठवडाभरात पूर्ण वाढ होऊन फुलतात. घराच्या अंगणात रात्री चंद्र-तारका फुलवून अंगणाचे रमणीय नभमंडळ करणाऱ्या या फुलांचे अनोखे सौंदर्य अनुभवणे म्हणजे आनंदाचे डोही आनंद तरंगच!

**जन्म आणि मृत्यू, अंतर दोन पळांचे**
**गंधभारलेले आयुष्य, मंतरलेल्या क्षणांचे...**

काव्यरसानुभूती




# मानवी अस्तित्वशोधाचा गूढरम्य प्रदेश

कविवर्य ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' या पहिल्या काव्यसंग्रहातील ओळख (पृ.१४) ही कविता प्रातिनिधिक स्वरूपात कवीच्या अस्तित्वशोधाचा आणि अस्तित्वभानाचा प्रवास प्रभावीपणे व्यक्त करणारी एक कविता...

**मालविल्या सांजदिव्यांची, तममार्गावरती खंत**
**वृद्धेच्या ओवीमधला, उरी दाटून ये भगवंत**
**तुटलेली ओळख विणता, प्राणांची फुटते वाणी**
**पायातून माझ्या फिरतो, अवकाश निळा अनवाणी.**
**(संध्याकाळच्या कविता, ओळख, पृ. १४)**

ग्रेसकाव्यातील देशीय अनुबंधाचा विचार करता सतत जाणवणारी एक गोष्ट म्हणजे त्यांच्या काव्यात सर्वत्र ऐकू येणारा अध्यात्मजाणिवेचा सूर. या काव्यनिर्मितीतील आध्यात्मिक जाणिवेचा परीघ खूप मोठा आहे. उदासीनता, दुःख, परात्मता, ईश्वरी तत्त्वाशी संवाद, एकरूपतेची आस, सततची अस्वस्थता, गूढता, पारंपरिक संदर्भांची गर्दी, शब्दकळेवरचा धार्मिक-आध्यात्मिक परिभाषेचा प्रभाव इत्यादी अनेक गोष्टी ग्रेसकाव्यात एकरूप झालेल्या दिसतात. हे आध्यात्मिक पर्यावरण ग्रेसकाव्याचा अविभाज्य भाग असल्याचे कवीलाही जाणवते. वाचकांनाही अनुभवता येते आणि ग्रेसच्या भाष्यकारांनीही त्याची वर्णने करून ठेवलेली आहेत. ईश्वरी श्रद्धा हे ग्रेसकाव्याचे एक आधारकेंद्र आणि चैतन्यकेंद्र आहे, असे लक्षात येते.

माझ्या जडणघडणीवर फक्त माझ्या आईचा व ईश्वराचाच परिणाम झाला आहे, असे ग्रेस स्वतः सांगतात. त्यांच्याच मते, माझ्या काव्यात प्राचीन व मध्ययुगीन वातावरण-प्रतिमासृष्टी फिरून फिरून अवतरत असते... माझ्या व्यक्तित्वात मूलतःच संचिताने मेटॅफिजिकल व स्पिरिच्युअल पॅशन्स संक्रांत झाल्या आहेत. या अशा अस्तित्वशोधाचे प्रातिनिधिक रूप ठरेल, अशी ही कविता 'ओळख'! ग्रेसकाव्याला एरवी व्यापून राहणाऱ्या दुर्बोधतेचा काच इथे शीर्षकापासूनच सैल झालेला दिसतो! कवितेत कवी म्हणतो-

• राजेंद्र नाईकवाडे
९८५०३५१०२५

**त्या श्रद्धेचे घाव मनावर**
**घालित यावे तुझे पिसेपण**
**अनंत अवकाशातून प्राशिन**
**तुझ्या नभाचे स्निग्ध निळेपण...**
**सायंवेळी मनात जळते**
**पारावरची निळसर ओवी**
**स्वप्नांच्या छायेतून फिरते**
**नेत्रघनातील माया हळवी**

सांजदिवे मालवल्यामुळे तम-मार्गावर चालणाऱ्याला स्वाभाविकपणेच खंत वाटते, भय वाटते, संभ्रम वाटतो! जीवनवाट अंधारात हरवू पाहते! आणि...मग अशावेळी सहजपणेच त्या विश्वनियंत्याची, भगवंताची आठवण मनात उमलून येते. तो परमेश्वर वृद्धेच्या ओवीतला अस्सल करुणेने व्याप्त मनातून उगवलेला परमेश्वर आहे! पुढल्या ओळीत काहीशी दुर्बोधता प्रत्ययाला येते, ती प्राचीन संदर्भांमुळे आणि प्रतीकांमुळे! पानांच्या जाळीमधले/वाऱ्याने कुंडल डुलते/ ओठांची मिथिला त्याया/ पदरातून नभ व्याकुळते. पानांच्या जाळीत वाऱ्याने कुणाचीतरी कुंडले डुलत असल्याचा भास होतो! आणि मग त्या राघवाच्या कुंडलामागोमाग संज्ञाप्रवाही पद्धतीने शब्दांतील मिथिला (जानकी) धारण करण्यासाठी कवीच्या मनात, त्याच्या पदरात नभांगणाएवढे दुःख दाटून येते. जानकीच्या शोधार्थ विरहभावाने व्याकुळ होऊन वनात दिशाहीन भटकणाऱ्या राघवासारखी कविमनाची अवस्था होते! या परिप्रेक्ष्यात जानकी हे दुःखाचे प्रतीक म्हणून येते! या तीन कडव्यांच्या छोट्या कवितेत सघनपणे व अल्पाक्षरशैलीत कवीचा अस्तित्वशोधाचा अनुभव व्यक्त होतोय! मूलतः ईश्वराचा अंश असणे, त्याच्याशी नाते असणे ही अद्वैताची जाणीव इथे महत्त्वाची आहे. कवीचे हे तुटलेले नाते (त्याचा जन्म, त्याचे अस्तित्व); जी त्याची खरी ओळख आहे, ती जोडण्याच्या प्रयत्नात, नात्यांची धागी विणण्याच्या प्रयत्नात, प्राणातून सहज शब्द फुटतात, निर्माण होतात आणि कवितेचे रूप धारण करतात!

इथे ग्रेस आपल्या काव्याच्या निर्मितीची प्रक्रियाही कथन करीत आहेत. हृदयातून, प्राणातून शब्द निघतात! क्षितिज जसे दिसते/तशी म्हणावी गाणी/ देहावरची त्वचा आंधळी/ छिलून घ्यावी कोणी, ही त्याची प्रतिज्ञाच असल्याने मग अशा अस्तित्वशोधाच्या प्रवासात निळा अनवाणी अवकाश माझ्या पायातून फिरत राहतो, पायात घोटाळत राहतो, असे कवी सांगतो.

स्तोत्रात इंद्रिये अवघी गुणगुणती दुःख कुणाचे/हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणांचे... भय इथले संपत नाही/ मज तुझी आठवण येते/ मी संध्याकाळी गातो/ तू मला शिकविली गीते किंवा घनांनी वाकलेला मी/फुलांनी झाकलेला मी/ जराशा मंद स्पर्शाने/ मनाला कंप का सुटतो?/ मनातून वाहणारी ही/ युगांची आंधळी गाणी/ जरासे खोल बघताना/ गळ्यातून शब्द का फुटतो... किंवा मी महाकवी दुःखाचा/ प्राचीन नदीपरी खोल/ दगडाचे माझे हाती/ वेगाने होते फूल अशाप्रकारे कितीदातरी, कितीतरी ओळींमधून कवी आपले अवघे व्यक्तित्व कसे संस्कृतिसंचितात भिजलेले, त्याच्याशी लगडलेले आहे, हे व्यक्त करीत असतो. जणू भूत-वर्तमान-भविष्य असा सतत सर्वकाळात सर्वसाक्षी होऊन असलेला तो एक अखंड वाहणारा चैतन्यस्रोत एका आत्म्याच्या रूपात विद्यमान असतो. अशावेळी कवीचे व्यक्तिमत्त्व, अनुवंश, परिस्थिती आणि संस्कार यांनी घडणारे व्यक्तिमत्त्व याला खूप महत्त्व प्राप्त होते. मी टाचण टिपणातला कवी नाही, असे ग्रेस नेहमीच सांगायचे. ज्यावेळी आपण स्वातंत्र्योत्तर काळातील काही कथित आधुनिकतावादी, पुरोगामी टाईपच्या टिपिकल, ठोकळेबाज कवींशी ग्रेसांची तुलना करतो, तेव्हा या मंडळींचे देशी बंधांपासून तुटलेपण आणि ग्रेसांचे देशी तत्त्वांशी बांधलेपण स्पष्टपणे अधोरेखित होते! 'ग्रेस' या शब्दाचा अर्थही ग्रेसकाव्यातील आशयाशी संवादी असाच आहे.



## संघ शक्तीचा अरुण इथे

स्वातंत्र्याचा सूर्य उगवला उजाडले पण तेज कुठे?
भ्रष्टाचारी तिमीर दाटला चारित्र्याचा मित्र कुठे?

स्वैराचारी जन-मेळावे सदाचारी नेतृत्व कुठे?
स्वार्थांधता तम आसावला परमार्थाचा रवि कुठे?

मानवतेच्या निव्वळ गप्पा समरसता ही दिसे कुठे?
मत्सराचे मळभ दाटले दयार्द्र तो मरिचय कुठे?

मनातील ही एकची खंत चर्मचक्षुनी दिसे कुठे?
ग्रहण लागले स्व-सूर्याला मुक्तीचा सवित्रेय कुठे?

दुर्जनांचे करू निर्दालन सज्जनांचा मेळ कुठे?
त्यजु निराशा धरूनी आशा संघ शक्तीचा अरुण इथे!

• वासुदेव नळकांडे
९७६७२४६५१४

• संयोजक : संजय रामगिरवार,
९८८१७१७८३२

स्पंदन

# चाकोरी...

सर्व शहाणीसुरती माणसे जगरहाटीशी जुळवून घेतात. काही चाकोरीबाहेरची व्यक्तिमत्वे जगरहाटीलाच आपल्याशी जुळवून घ्यायला भाग पाडतात. जगात जी प्रगती झाली आहे, ती अशा चाकोरीबाहेरच्या माणसाकडूनच, त्यांच्या सदैव नाविण्याच्या शोधात असलेल्या वृत्तीकडूनच झालेली आहे, असे जॉर्ज बर्नाडश्या म्हणून गेलेत...

पण, अशी किती चाकोरीबाहेरची, नाविण्याच्या शोधात असलेली माणसे सभोवताली असावी? बहुतांशी लोकांना चाकोरी खुणावत असते, कारण त्यात सुरक्षितता असते. त्यात एक प्रकारची खात्री असते. त्यामुळे चाकोरी सोडायला सहसा कोणी तयार होत नाही. जो चाकोरी मोडून प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहण्याचा प्रयत्न करीत असतो, त्याला जग मुर्खात काढत असते.

शिक्षण, नोकरी, लग्न, संसार, म्हातारपण आणि मृत्यू ही चाकोरी. एखाद्याचे शिक्षण झाले की आता नोकरी कधी? असे विचारले जाते. नोकरी लागली की आता लग्न कधी विचारले जाते. लग्न झाले की आता मुल कधी विचारले जाते... मग मुलांचे शिक्षण... त्यांची नौकरी... त्यांचे लग्न... त्यांची मुलं... असे हे चक्र सुरू असते, ज्याला चाकोरी असे म्हटले जात असते.

• आशिष देव
७७४१८१८४१८

याउलट एखाद्याने पारंपरिक शिक्षण न घेता दुसऱ्या क्षेत्रात काही करण्याचा प्रयत्न केला, एखाद्याने नोकरी न करता व्यवसाय केला, एखाद्याने लग्न नाही केले, एखादा मुलबाळाच्या भानगडीत नाही पडला की, तो चाकोरीबाहेर गेला, असे मानले जात असते व त्याच्याकडे वेगळ्याच नजरेने बघितले जात असते.



नाना पाटेकरचा एक सिनेमा आहे. त्यात तो वृद्ध दाखवला आहे. त्याने लग्न केले नसते. एका दुकानात त्याचा वाद होतो. दुकानदार नानाला समजवतो व त्याला चॉकलेट देत म्हणतो की, ये रख लिजिए चॉकलेट आपके पोते के लिये... यावर नाना भडकतो आणि म्हणतो, क्या हर बुढे आदमी को पोता होना जरुरी है? दुकानदार नानाला चाकोरीतील व्यक्ती समजतो म्हणून तसे म्हणतो. लग्नही चाकोरी. लग्नच न करणे, लिव्ह इन रिलेशनशिप आणि लग्नानंतर मुल होऊ न देणे हे प्रवाहाच्या विरोधात जाणे. पर्यायाने टीकेचे धनी होणे. चाकोरीत जगणारे जीवनाचा जुगार खेळत नसतात. या उलट नाविण्याचा शोध असणारे, जगाला स्वतःशी जुळवून घ्यायला बाध्य करणारे जगासाठी दीपस्तंभ ठरून जात असतात आणि परिणामी जगाच्या प्रगतीसाठी पण कारणीभूत ठरून जातं असतात. एका वाक्यात या लेखाचा सार सांगायचा झाला, तर असे म्हणता येईल, चाकोरी म्हणजे हाय-वे आणि काही तरी वेगळे करण्याचा अट्टाहास धरणे म्हणजे माय-वे... माय-वे म्हणजे, ट्रेंड सेटर्स आणि हाय-वे म्हणजे फॉलोअर्स...

मै अकेलाही चला था जानीबे मंझिल, मगर लोग साथ आते गये और कारवां बनता गया... या मजरुहच्या ओळी म्हणजे... जगरहाटीला स्वतःशी जुळवून घेण्यासाठी बाध्य करणे...



गावगाडा

# लग्नाचे गाणे!

काही गाणी कित्येक वर्षांपासून गावखेड्यात गायिले जातात. जसे की, लग्नाचे गाणे, पाळणे, धान रोवणीचे गाणे, तर कधी दळण, कांडण करतानाचे गाणे, झुलवेसुद्धा म्हटले जाते. आजही गावखेड्यात थोड्या प्रमाणात का होईना, वयस्कर महिला लग्न समारंभात गाताना दिसतात. आदिवासी समाजात लग्न होणाऱ्या मुलीची किंवा मुलाची आंघोळ करून देतात आणि त्यांना पाटावर उभे केले जातात आणि मग त्या नवऱ्या मुलीसाठी माहेरची साडी, ब्लॉऊज, परकर एकत्रित बांधून तिचा बाप आपल्या खांद्यावर ते वस्त्र ठेवतो आणि नंतर आपल्या खांद्यावरून तेच वस्त्र नवऱ्या मुलीच्या खांद्यावर ठेवतो, त्याला आदिवासी समाजातील लोक घडी वाटणे किंवा घडी टाकणे असे म्हणतात. जेव्हा त्या मुलीचा बाप घडी टाकायला जातो, तेव्हा ती नवरी मुलगी बापाच्या गळ्यात हात घालून खूप रडत असते. अशावेळी तेथे जमलेल्या महिला घडी वाटण्याचे गाणे म्हणतात...

• संगीता ठलाल
७८२१८१६४८५

**घडी वाटा, वाटी गा बाबा, घडी वाटा वाटी, गा...**
**इतका उशीर का झाला गा बाबा घडी वाटा, वाटी गा...**

तो क्षण खूप भावुक करणारा असतो. बापाच्या अंगाखांद्यावर खेळणारी ती लेक आज एवढी मोठी झालेली असते आणि अचानक लग्न होऊन सासरी जायची असते. लहानपणी बाप तिच्यासाठी फ्राक, निरनिराळे कपडे घेऊन देतो आणि आज लग्नाच्या दिवशी माहेरची साडी भेट म्हणून देतो. आदिवासी समाजातील मुलींचे लग्न माहेरच्याच साडीवर लागते.

अशा या गाण्यांमुळे संस्कृती टिकून राहत होती. पण, दिवसेंदिवस डीजेच्या नादात रमलेल्यांमुळे असे हृदयस्पर्शी गाणे क्वचितच ऐकायला मिळते. मंडप पूजन असते आणि त्यावेळी रात्रोला नवरीला बांगड्या भरून झाल्यावर काचारीन बाई घरी जाण्यासाठी थोडी घाई करते तेव्हा...

**वल्यां, वल्यां मांडवात आली कचारीन बाई**
**हिरवा चुडा भर व संगीता बाई**
**वल्यां, वल्यां मांडवात आली कचारीन बाई**
**कचारीन बाई नको करू घाई**
**मानाच्या नंदा, भावजा, बहिणी अजून आल्या नाही...**

मन्याच्या काड्या

# बुढी काहून खवयली



नाम्याच्या घरात पिकल्या पानाईची काई कमी नोती. थ्याचं घर म्हंजी 'मिनी वृद्धाश्रम' होतं. नाम्याचा बाप असन पंचात्तरीचा... नाम्याचा काका बिनालग्नाचा होता सत्तरीचा... नाम्याची माय असनं सत्तरीच्या आसपास... नवरा गेल्यापासून नाम्याची आत्या थेतच राहे अन थे असन ऐंशी वयाची, मोठी होती घरात. पन याच्यात नाम्याची माय शांत होती. 'पुढ्यात वाढलेलं गुपचूप गिळे अन सोताचं लुगडं सोताच पिळे' थे म्हंते नं "जुनं हाड अन उभं झाड" तस होतं. पन नाम्याची आत्या मातर करारी होती. तीले उलीसं काई बोल्लेल नाय खपे. खवयुनच जाये. "बोलाले बोलकी अन कामाले हलकी" अशी होती थे. एका कामाले हात नाय लावे. एका जागी ठिय्या बसला तो बसला. पन कीर्तनाले न चुकता जाये. तीले कीर्तनापेक्षा कीर्तनकार बुवाचं लय आवडे. त्याले मन भरून पाहून ये. त्या वर्षी भारतात कोरोनानं लय धुमाकुय घातला होता. नाम्या म्हने, 'ए आत्या, अवं बाहेर जाऊ नको, थो कोरोना फिरून रायला गावात. बुढे-बाढे दिसले का चिपकते म्हने त्यायले. अन एकदा का तो चिपकला का मंग रामनाम सत्य... 'राम नाम सत्य' म्हन्लं का बुढी खवयुन अंगावरच धावे. पोट्टे मंग पुना चिडवे.

एक दिवस का झालं, आत्या सकायी उठलीच नाय. नाम्या हलवु हलवु उठवे तं ते फक्त खोकले न दे मान टाकुन. आजुबाजूचे लोकं गोया झाले. कोन्तरी हात पकडला अन म्हने, "बुढीचं आंग लय गरम हाय, इले त खोकला अन सर्दी बी झाली हाय..." गर्दीतून कोनीतरी म्हने, "भाऊ मले तं वाटते हा कोरोना व्हय," असं म्हनल्यावर गर्दी भक्कन कमी झाली. जाता जाता कोनीतरी म्हने, "बुढीनं वरतं जा ची तयारी केली दिसते नाम्या...पायजो..." "अबे लवकर शयरात ने... नाय तं खपते लवकर..." जो तो नाम्याले घाबरवून दे. आता कोनीच हात लावाले तयार नव्हतं. नाम्यानं जवारी टाकते ते प्लॅस्टीक आणलं अन बुढीले गुंडायुन बसवुन ठेवलं. नाम्याच्या बापानं पटकन जावून किसन्याचा ऑटो आणला. किसन्याचा ऑटो म्हंजे खरुजलेलं कुत्र दिसते तसा ऑटो. पुरा पेन्ट उखडलेला... सीट म्हणानं त मानुस स्प्रींगवर बसावं इतकी खतम... पण किसन्याचा ऑटो म्हंजी गावातली ॲम्बुलन्स होती. किसन्या धावत आला. मगं समद्याईनं हातभार लावला अन ऑटो निघाला नागपूरच्या दिशेनं. नागपूरात कोनीच दवाखानेवाले घेत नव्हते. पैसे कितीक हाय इतकचं इचारे मंग गरीबाचं मेडीकलच बेस्ट हाय, असं कोन्तरी म्हने अन ऑटो पोचला मेडीकल मंधी. तेथं त जत्राच होती. कोनी कोणाचं नव्हतं. डॉक्टर धावपय करत होते. देवाच्या कृपेने एक डॉक्टर भेटलाच. "हं...काय झालं...आजीबाईची टेस्ट करा लागते..." मंग टेस्टवाला आला. त्यानं कायची तरी काडी नाकात खुपसली तशी आत्या जोरात शिंकली अन तिनं डोये उघडले. "हेंबाळथुताया नस टाकाची नाकात तं काडी टाकते?" नाम्या म्हने, "अवं हे डॉक्टर व्हय...टेस्ट करून रायले तुही..." "बाप्पा...मले का चाटुन पाहीन का ह्या..." नाम्यानं कपाळावर हात मारला. डॉक्टर म्हने रिपोर्ट दोन दिवसानं येईन तवरीक आजीले ॲडमिट करून टाका. मंग तिथं आपलं कायचं चालते. दोन चार पोरं आले अन बुढीले स्ट्रेचरवर झोपवून वार्डात ॲडमिट करून गेले. आता तो कोरोनाचा वार्ड. डॉक्टर कोरोनाची किट घालून दिसला का आत्याबाई इचारे, "बाहेर लय पाऊस हाय का मा..." तिले वाटे डॉक्टरनं रेनकोटचं घातलं का बा! तिथं कोनालेबी येन्ट्री नव्हती. नाम्यानं एका वार्डबॉयले पटवून दिलं होतं. बिडीच्या बंडलसोबत पन्नास रुपये दिले होते. तो आत्याबाईचा हालचाल सांगे अन मंग नाम्या गावाकडे निघून जाये. इकडे दोन दिवसानं रिपोर्ट नॉर्मल असा आला. आत्याची रवानगी नॉर्मल वार्डात केल्या गेली. दुसाया दिवशी पुन्हा नाम्या आला. वॉर्डबॉयले इचारलं त तो म्हने आत जाऊन पायतो. दहाक मिनिटानं तो बाहेर आला अन म्हने, "भाऊ बुढी गचकली दिसते...जागेवर नाय...दुसराच कोनी हाय त्या बेडवर..." एवढं बोलून निघून गेला. नाम्याची पार घाबरगुंडी उडाली. तो तडक गावाकडे गेला. पाहता पाहता आत्याबाई गेल्याची वार्ता गावात पसरली. नाम्याच्या घरी गर्दी जमा झाली. इकडे नाम्या, किसन्या अन एक दोन माणसं दवाखान्यात गेले. खुप शोध घेतला, पण आत्या कुठचं सापडली नाही. कोनी म्हने जनरल वार्डात पहा तं तेथंबी दिसली नाही. "भौ कोरोना पेशंट गेला का सरकारच त्याची विल्हेवाट लावते...मले वाटते का..." चर्चा सुरू झाली. इकडे गावात एक ऑटो नाम्याच्या घरापाशी थांबला अन आत्याबाई उतरली. तिले पायल्यावर समदे घाबरून 'भूत' समजून पळून गेले. नाम्याच्या बापानं धीर धरून इचारले," तू जिती हाय का व..." जो उखडली का इचारुच नका आत्या. मंग तिनं समदी हकीकत सांगितली. तिकडे नाम्याले कळलं अनं नाम्या अन सोबती गावाकडे रवाना झाले. झालं असं होतं का जेव्हा आत्याले जनरल वार्डात नेलं तेथ तिच्याच बेडच्या लागून तिच्याच वयाची गावातली सातपुतीन ॲडमिट होती. दोघीनं ऐकमेकाले बघितलं अन मिठीच मारली. मंग का दोघीबी मस्त गप्पा गोष्टीत दिवस घालवे. त्या दिवशी डॉक्टर म्हने, "आता तुमी दोघीबी ओके आहात, बेड खाली करा" असं म्हणून सुटी दिली. नाम्या नेमका त्या दिवशी आला नव्हता. मंग आत्या सातपुतीनं सोबत या ऑटोनं आली..." हळुहळू गावातले लोकं पुन्हा जमा झाले. घामाजोकळ नाम्या पन येवून पोहचला. त्याले समदी हकीकत समजली. सगळ्याईले लय आनंद झाला, पन या धामधुमीत 'सामान' आणनाऱ्याले काहीच खबर नव्हती. ते बास-लाह्या, हार, उद, ताहाटं, पांढरं कापड वगैरे घेऊन आला. आत्या समोरच बसली होती. तिले जसे सामान दिसले तसी ती जे खवयली का इचारू नका. 'सामान' तेथचं टाकून मानसं पळून गेले. आजुबाजूचे लोकं हासायले लागले. नाम्या, नाम्याचा बाप, आई समदे खो खो हासू लागले, फक्त आत्याबुढी सोडून. आता रोज बुढी दिसली का लोक चिडवते..."आण रे सामान" अन असं म्हनलं का बुढी खवयते. गावात मजा येते...

• मनोज वैद्य
९८२२९४९२६०

# आरोग्यवर्धिनी तुळस

**महाप्रसाद जननी सर्व सौभाग्यवर्धिनी**
**आधि,व्याधि हरिःनित्यः तुलसीत्वं नमोस्तुते।**

भगवान विष्णूंना प्रिय असणारी तुळस ही बहुगुणी अशी वनस्पती आहे. तिचे जेवढे उपयोग सांगता येतील, तेवढे कमीच आहेत. तुळशीची रोज पूजा करणे याचा अर्थ आरोग्याचे रक्षण करणे, असा आहे. धर्मशास्त्रात तुळशीचे महत्त्व सांगितलेले आहेच. तुळस ही आपल्या संस्कृतीचे प्रतीक आहे.

**ज्यांच्या घरी नाही तुळशीवृंदावन,**
**जाणावे स्मशान तेथेची हो।**

संतांच्या मेळ्यात, भक्तांच्या हृदयात आणि तुळशीजवळ माझा नित्य वास असतो, असेदेखील भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे. तुळस खऱ्या अर्थाने 'महाऔषधी' आहे. शारीरिक, मानसिक रोगी दूर करण्याचे अपार सामर्थ्य तुळशीमध्ये आहे. तुळशीमुळे आध्यात्मिक उन्नती व मानसिक बळ वाढते. तुळशीला अनेक नावे आहेत. उत्पत्तीवाचक, परिचयवाचक, गुणवाचक अशा आशयावरून ती पडली आहेत. भारतात निरनिराळ्या राज्यांत तुळशीला त्या, त्या राज्यातील भाषेनुसार वेगवेगळी नावे आहेत.

**तुलसी सुरसा ग्राम्या सुलभा बहुमंजरी।**
**अपेतराक्षसी गौरी शुलग्नी देवदुन्दुभी।**
**तुलसी वैष्णवी वृन्दा सुगन्धागन्धहारिणी ॥**

तुळशीच्या वेगवेगळ्या प्रजाती सांगितल्या आहेत. आयुर्वेदानुसार श्वेततुळस व कृष्णतुळस हे दोन प्रकार आहेत. तुळस ही सहज उपलब्ध होणारी वनस्पती आहे. घरोघरी, बागेत, मंदिराभोवती तुळस लावता येते. भारत, ब्रह्मदेश, श्रीलंका येथे सर्वत्र व हिमालयात आठ हजार फूट उंचीपर्यंत तुळशीची झाडे आढळतात. तुळस ही गुणाने लघु, रूक्ष तर रस हा कटु, तिक्त आहे. ती उष्ण कफवातनाशक व पित्तदोष वाढविणारी आहे. मेदपाचक व मलदुर्गन्धीनाशक अशी ही तुळस आहे.

तुळशीचे अनेक उपयोग आहेत. तुळस ही उचकी, खोकला, विषरोग, श्वास लागणे व पार्श्वमूळ नष्ट करते. (च.सू.अ२७.१६९). तुळस उष्ण, रूक्ष असून, कफनाशक आहे, ती कृमीरोग नष्ट करते, अरुची नष्ट करते, जठराग्नी प्रदीप्त करते. संधीवात, आमवात, मूत्रदाह, मधुमेह, डोकेदुखी, हृदयरोग, त्वचारोग, प्रदररोग यात गुणकारी आहे. तुळस स्वास्थ्याचे रक्षण करते, तर अस्वास्थ्याचे विकार प्रशमन करते, म्हणजेच मानवाचे आरोग्य वाढविते. हवेचे शुद्धीकरण करून किटकांना दूर पळविते, वातावरण शुद्ध व पवित्र करते. तुळशीचे अनेक



प्रकारे सेवन केल्यास सर्व प्रकारचे रोग दूर होऊ शकतात.

आजच्या पर्यावरण प्रदूषण काळात तुळशीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वायुशुद्धी आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची आहे. धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, आरोग्यकारक असणाऱ्या तुळशीने शारीरिक, मानसिक, आत्मिक फायदा होऊन रोगनिवारण होते. म्हणूनच सहज येणाऱ्या, विशेष जागेची व खर्चाची आवश्यकता नसणाऱ्या तुळशीचे एक तरी रोप घरी लावा व आपले सर्वांगीण कल्याण साधा.

तुळशीची पाने घातलेले पाणी जो पितो, त्याची सर्व रोगांपासून मुक्तता होते. म्हणूनच सहज उपलब्धता, रोगनाशनाचे व शरीर निरोगी राखण्याचे कार्य करणाऱ्या तुळशीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

झाड लावा तुळशीचे, अनुभव घ्या सुखाचे...

• प्रा. योगिनी देगमवार
९९७०१५५२७८

# संत निरंकारी मिशनचे वननेस वन अभियान

## निसर्ग कॉलनी परिसरात होणार वृक्षारोपण!




तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

संत निरंकारी मिशन हरित जाणीवेला आणि पर्यावरणाप्रती अतूट समर्पणाला निरंतर वृद्धिंगत करत वननेस वन उपक्रमाच्या पाचव्या चरणांतर्गत देशभरातील अनेक नवीन ठिकाणे या जनसामुदायिक अभियानाशी जोडेल. सकाळी ६ ते ९ दरम्यान हजारो सेवेकरी आणि श्रद्धाळू भाविक एकत्रितपणे वृक्षारोपणाच्या माध्यमातून निसर्गाप्रति आपली निष्ठा व त्याच्या संरक्षणाचा संकल्प याचा पुनरुच्चार करतील.

जालना नगरीमध्ये यापूर्वी नवीन एमआयडीसी येथे पहिल्या टप्प्यात २१ ऑगस्ट २०२१ वृक्षारोपण ६५० झाडे लावण्यात आले तर ०४ ऑगस्ट २०२४-१५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर आता तिसरा टप्पा १७ ऑगस्ट २०२५ रोजी निसर्ग कॉलनी, निरामय हॉस्पीटलसमोर, व्हीव्हीएस कॉलेजच्या पाठीमागे, ममादेवी ते रेल्वे स्टेशन मार्ग, जालना येथे शंभर झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली २०२१ मध्ये सुरू झालेली वननेस वन परियोजना ही केवळ एक वृक्षारोपणाचा उपक्रम यापुरते मर्यादित नसून ते निसर्गाशी समतोल व सह-अस्तित्वाची भावना जागृत करणारे एक महत्त्वपूर्ण अभियान आहे. आपण निसर्गापासून वेगळे नसून त्याचाच एक अविभाज्य अंग आहोत ही भावना या अभियानातून शिकवली जाते. तद्वत या निसर्गाचे संरक्षण म्हणजे प्रत्यक्षात स्वतःच्या जीवनाचे आणि भविष्याचे रक्षण करणे होय.

वृक्षांच्या या रोपट्यांनी इतकी घनता प्राप्त केली आहे की ती आता एका लघु वनाचे स्वरूप धारण करु लागली आहेत. हे परिवर्तन केवळ बाह्यरूपी हिरवळी पुरते मर्यादित न राहता, आता या लघु वन प्रदेशात अनेक प्रवासी व दुर्मिळ प्रजातींचे पक्षीही आश्रय घेऊ लागले आहेत, ज्या प्रजाती पूर्वी नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर होत्या.

निःसंशयपणे, जैवविविधता व पर्यावरणीय समतोल राखण्यात या सर्व सजीवांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. वननेस वन अभियान हे केवळ पर्यावरणाच्या रक्षणाचे माध्यम नाही, तर मानव आणि निसर्ग यामध्ये पुन्हा एकदा आत्मिक नातेसंबंध स्थापित करत आहे. एक असे नाते जे खर्या अर्थाने मएकत्वाचेफ प्रतीक आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे वननेस वन अभियानाअंतर्गत आतापर्यंत देशभरातील ६०० हून अधिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. ही केवळ हिरवळ वाढवण्याची मोहिम नसून, लघु वनांच्या रूपात एक शाश्वत आणि संतुलित पर्यावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक यथायोग्य प्रयत्न आहे. मिशनचे स्वयंसेवक या वृक्षरोपांची देखभाल अत्यंत श्रद्धा व समर्पणाने करत आहेत, कारण त्यांच्यासाठी प्रत्येक रोपटे हे केवळ एक वृक्ष नसून भावी पिढ्यांच्या श्वासांचा आधार आहे.

पूज्य बाबा हरदेव सिंहजी यांचा सुवर्णरूपी संदेश - प्रदूषण अंतर्मनातील असो अथवा बाह्यजगातील, दोन्ही हानिकारक आहेत - या संपूर्ण अभियानाचा प्रेरणास्त्रोत बनला आहे. याच जाणीवेने प्रेरित होऊन, संत निरंकारी मिशनचे सेवादार बाह्य पर्यावरणासोबत अंतःकरणाची शुद्धता राखण्याच्या दिशेने प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करत आहेत. कारण जेव्हा मन निर्मळ असते, तेव्हाच विचार, वाणी आणि कर्मही निर्मळ असतात.

संत निरंकारी मंडळाचे सचिव, श्री. जोगिंदर सुखीजाजी यांनी सांगितले, की वननेस वन उपक्रमांतर्गत स्थानिक पर्यावरणानुसार वृक्षांची निवड करून त्यांची देखभाल जैविक खत, स्वच्छ पाणी आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केली जाते, जेणेकरून दीर्घकाळ हरितता सुनिश्चित होईल. ते पुढे म्हणाकिरण गरडले, की पर्यावरण संकटाच्या या काळात मिशनचा हा पुढाकार एक समयसूचक, जागरूक आणि समाजासाठी प्रेरणादायक असा उपक्रम आहे.

निःसंशयपणे, हा उपक्रम संत निरंकारी मिशनच्या निसर्गप्रेमाचे आणि त्याप्रती असलेल्या जबाबदारीचे एक उज्ज्वल उदाहरण आहे, जे समाजाला सह-अस्तित्व आणि समतोल या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देत आहे

## संक्षिप्त

### स्वच्छता कर्मचाऱ्यांना साडी चोळीचे वाटप



तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी

नगर पंचायत कार्यालयातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना रक्षाबंधन व स्वातंत्र्य दिन निमित्ताने साडी चोळीचे वाटप करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष व बाजार समिती संचालक वैजनाथ बोराडे व उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, माजी उपनगराध्यक्ष जे. के. कुरेशी, नगरसेवक अचित बोराडे, शेषनारायण दवणे, उबेद बागवान यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### श्री रेणुका देवी मंदिरात चांदीची पंचारती दान



तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरातील श्री रेणुका देवी संस्थान येथे श्रावण महिन्यातील बुधवारी देवी भक्त काशिनाथ नागोराव कुलकर्णी यांनी ५२ हजार रुपये किमतीची अर्धा किलो चांदीची पंचारती देवी मंदिरास पुजारी अमर ठोके यांच्याकडे दान दिली. यावेळी शकुंतला काशिनाथ कुलकर्णी, मंजुश्री मोताले, मिलिंद नाईक, रोहिणी नाईक, महेश नाईक, भगवान कुलकर्णी यांच्यासह आदींची उपस्थिती होती. मंठा येथील श्री रेणुका देवी हे जागृत देवस्थान असून या ठिकाणी भाविक-भक्त मोठ्या प्रमाणात दर्शन व नवस फेडण्यासाठी गर्दी करतात

### बदनापूरमध्ये वेश्याव्यवसायावर पोलिसांची धडक मोहीम! शिवराज हॉटेलवर छापा सहा जण ताब्यात



तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-बदनापूर महामार्गावर गेली दोन वर्षे बेकायदेशीर देहविक्री व्यवसाय राजरोस सुरू असल्याच्या तक्रारींना अखेर पोलीसांनी आळा घातला आहे. नवीन पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांच्या इशाऱ्यानंतरही सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर बुधवारी रात्री धडक कारवाई करत पोलिसांनी शिवराज हॉटेलवर छापा टाकला. कारवाईत तीन महिला आणि तीन पुरुष पोलिसांच्या ताब्यात आले. बदनापूर तालुक्यात जुगार, मटका आणि वेश्याव्यवसाय यांसारख्या अवैध धंद्यांनी गेल्या काही वर्षांत डोके वर काढले होते. नागरिकांनी वारंवार तक्रारी करताना, यावर ठोस कारवाई व्हावी अशी मागणी केली होती. याआधी तत्कालीन पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांना आमदार नारायण कुचे यांनी कडक इशारा दिला होता; परंतु धंदे काही दिवस बंद ठेवून पुन्हा जोमाने सुरू करण्यात आले. जुलै महिन्यात मच्छिंद्र सुरवसे यांनी पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारताच महामार्गावरील बियर बार व लॉजिंग चालकांना देहविक्री व्यवसाय तात्काळ बंद करा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असा दम भरला होता. मात्र, काही व्यावसायिकांनी हा इशारा धुडकावून लावला. बुधवारी संध्याकाळी शिवराज हॉटेलमध्ये देहविक्री सुरू असल्याची माहिती मिळताच, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने छापा टाकला. या कारवाईत सहा जणांना ताब्यात घेऊन, गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. ही धडक मोहीम बदनापूर परिसरातील अवैध धंद्यांविरोधातील पोलिसांची पहिली मोठी कारवाई ठरली असून, नागरिकांनी याचे स्वागत केले आहे.

## बैलपोळा सणानिमित्त शेतकऱ्यांना 'समृद्धी'चा तिसरा हप्ता जाहीर

### १०० रुपये प्रति टन प्रमाणे जमा होणार !!

तभा वृत्तसेवा
अंबड / प्रतिनिधी

अंबड घनसावंगी: ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देणारा समृद्धी साखर कारखान्याने बैलपोळा सणानिमित्त ऊस बिलाचा तिसरा हप्ता गुरुवारी जाहीर केला. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या उसासाठी १०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे हा हप्ता शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी दिली.

समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी गाळप हंगाम २०२४ -२५ साठी शेतकऱ्यांच्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन प्रमाणे दर जाहीर केला आहे. त्यानुसार पहिला हप्ता २५०० प्रती मे. टन प्रमाणे तर दुसरा हप्ता २०० प्रती मे. टन प्रमाणे यापूर्वी कारखान्याने शेतकऱ्यांना अदा केला आहे. आता बैलपोळा सणानिमित्त १०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे तिसरा हप्ता देण्याचा निर्णय चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी घेतला असून लवकरच तिसऱ्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.



समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपी पेक्षा २७३ रुपये जास्तीचा दर देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाचा सण आहे. शेतकरी हितासाठी या सणाच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी १०० रुपयांचा तिसरा हप्ता जाहीर केला आहे. लवकरच ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे.

– सतीश घाटगे पाटील, चेअरमन समृद्धी साखर कारखाना

## शहरातील मोकाट कुत्र्याचा तात्काळ बंदोबस्त करा - अभिमन्यू खोतकर

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना शहरातील मोकाट कुत्र्याचा तात्काळ बंदोबस्त करा अन्यथा महानगरपालिका प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. दि.१४ रोजी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या नेतुर्त्वाखाली युवासेनेचे शिष्टमंडळ महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना लेखी निवेदन दिले.

जालना शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात सुटला आहे.मोकाट कुत्र्यांच्या चाव्यामुळे जालना शहरातील दोन बळी गेले असून. कित्येक लहान मुले, वृद्धाना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला आहे. मोकाट कुत्री दुचाकी वाहनासमोर येऊन अनेक जणांचे अपघात झाल्याचे घटना समोर आल्याअसून त्यामुळं जालना शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळं महानगर पालिकेंने या मोकाट कुत्र्यांचा तातडीनं बंदोबस्त करावा अन्यथा युवासेना जालनाजिह्याच्या वतीने जालनेकराच्या भावना लक्षात घेऊन तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी शैलेश घुमारे, शुभम टेकाळे, दीपक वैद्य, दिनकर घेवंन्दे, गोपीकिशन घोगडे, कुणाल जाधव, सागर पाटील, भूषण बनकर, गोविंद सोनुने, लखन कानिसे, संजय डुकरे, विक्रम कुसुंदल, अभिषेक जोगदंड, पीटर खंदारे, भोला कांबळे, शेख जफर, शेख नजीर, बिलाल सौदागर, रामिंसन घडे, सौरभ पडघन, सुशील भावसार, अरविंद भालेकर, किरण चोरमारे, बाळकृष्ण कोताकोंडा, राज रत्नपारखे, विक्की वाघमारे, दीपक हवाले, आमेर पठाण, स्वप्नील पाटील आदी सह शेकडो युवासैनिकाची उपस्थिती होती.

## आनंदी जीवनासाठी श्रीगीता, ज्ञानेश्वरी जाणून घ्यावी - ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

कर्तव्य, समता, सत्य, भक्ती, प्रेम आदी प्रकारच्या ज्ञानाचा प्रकाश देणारी श्रीकृष्णांची गीता व त्यावर प्राकृत भाषेत केलेली संत श्री. ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी ही आनंदी जीवनाचा मार्ग दाखवणारी असल्याने ती कळावी व वळावी असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले. श्री. ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती उत्सव सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र नेवासा, जेथे श्री ज्ञानेश्वर माऊलींनी श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना केली तेथे जालना निवासी डॉ. फड यांचे संस्थानच्या वतीने प्रवचन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात बोलतांना फड म्हणाले की, बंधू भगीणीवर कसे प्रेम करावे, सत्य काय, असत्य काय, कर्म हीच पूजा, जीवनाचे महत्त्व, भक्ती म्हणजे काय, अभ्यासाने अवघडही साध्य होते, सकारात्मक दृष्टी सुखी जीवनाचा आधारस्तंभ, अशा आशयाने फड यांनी मांडणी केली. आपणाला श्रीकृष्ण व ज्ञानदेवांप्रमाणे इतरांचे जीवन घडवता नाही आले तरी चालेल; पण स्वतःचे, कुटुंबातील सदस्यांचे जीवन तरी ईर्षा, व्देष, मत्सर, क्रोध, अहंकार आदिंपासून मुक्त होऊन घडवता आले पाहीजे. गीता ज्ञानेश्वरीची अनुभूती अशी सकारात्मक दृष्टी निर्माण करु शकते. गीता ज्ञानेश्वरी हे केवळ वाचण्या ऐकण्याचे ग्रंथ व विषय नाहीत तर ते खऱ्या अर्थाने अनुभवण्याचा विषय आहेत. पालकांनी मुले घडवण्याचे कार्य कसे करणे अपेक्षित आहे, नागरिक म्हणून आपली जबाबदारी कशी पार पाडावी याबरोबर विदयार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, या विषयाच्या अनुषंगानेही मार्गदर्शन केले. अत्यंत सखोल व दैनंदिन उदाहरणाच्या सहाय्याने फड यांनी मार्गदर्शन केल्याने अनेकांनी आपल्या भावना भारावून जाऊन व्यक्त केल्या. आम्हाला अशाच प्रवचनाची गरज होती, असे संयोजक व उपसथीत भाविकांनी बोलून दाखवले. यावेळी वेदांचार्य देविदासजी महाराज म्हस्के, पांडुरंग महाराज अभंग, कृष्णा पिसोटे, अभीजित पांढरे, ज्ञानेश्वर शिंदे महाराज, नेवासा भजनी मंडळांचे सदस्य आदी उपसिथत होते. श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## शहर कॉँग्रेस कमिटीकडुन स्व. विलासराव देशमुख पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना शहरातील काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जालना जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीकडून माजी मुख्यमंत्री तथा मराठवाड्याचे भाग्यविधाते स्व. विलासराव देशमुख साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त खासदार संपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास खा. डॉ. कल्याणराव काळे साहेब उपस्थित होते. या प्रसंगी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, बदर चाऊस, नंदाताई पवार, शहराध्यक्ष अतिक खान, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर इंगोले यांच्यासह जिल्हा व शहर काँग्रेसचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालन्यात तिरंगा सायकल रॅलीतुन स्वच्छता आणि आरोग्याचा संदेश

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला जालना सायकलिस्ट ग्रुप आणि फॅब रनर्स ग्रुप, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली.

सकाळी ७:३० वाजता मोतीबागेजवळील छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथून रॅलीला सुरुवात झाली. शनिदेव मंदिर, चमन, मस्तगड, सुभाषचंद्र बोस चौक, मामा चौक, सदर बाजार पोलीस स्टेशन, राजेंद्र प्रसाद रोड मार्गे ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे उत्साहात संपन्न झाली.

एकत्र येऊ, स्वच्छता व आरोग्य राखू ! या घोषणेसह रॅलीत स्वच्छ जालना, सुंदर जालना, बेटी पढाओ, सायकल चालवा, आरोग्य बनवा, जल है तो कल है असे प्रभावी संदेश दिले गेले. पर्यावरणपूरक प्रवास व निरोगी भविष्यासाठी नागरिकांना प्रेरणा देणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



रॅलीत प्रशांत भाले, काशिनाथ मोरे, रितेश डागा, अनिल मालपाणी, अर्जुन जगताप, कैलास जाधव, भास्कर पवार, डॉ. सतीश शेकडे, दिनेश अण्णा, श्रीराम सर, अजय सिंगला, जवाहर काबरा, कैलास मस्के, प्रमोद पातुरकर, शिवाजी हिवराळे, मिलिंद वासनिक, केशरसिंग राजपूत, संदीप तापडिया, विष्णू पाटेकर, बलराज शिराळे, ईश्वर बिल्लोरे, धनसिंग सूर्यवंशी, गजानन राठोड, मनोज कुमकर, डॉ. दिलीप दिवटे यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. सायकल रॅलीच्या यशस्वीतेसाठी कैलास जाधव, प्रशांत भाले आणि काशिनाथ मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

























जाहीरात संकलन : मधूकर अन्नेलवार किनवट